म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १०२२
१९३०

# माधवी

वाङ्मय विहार मंडळ
नाशिक.

REFBK-0002866
REFBK-0002866

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ८०७१

२८३३

REFBK-0002866
REFBK-0002866

# माधवी

संग्राहक

**वाङमयविहारमंडळ, नाशिक**

( सर्व हक्क वाङमयविहारमंडळ, नाशिक, याचे स्वाधीन. )

आवृत्ति १ ली

( द्वितीय नगर नाशिक वाङ्मयोपासक संमेलन दिन )

ता. १९ जानेवारी १९३०

**किंमत आठ आणे**

# प्रस्तावना.

सन १९२४ साली प. वा. अनंततनय यांनीं जी वाङ्मयविहारमंडळरूपी वाङ्मयलता लाविली तिला पद्मदल नांवाचा कवितापुष्पांचा पहिला बहर १९२७ सालीं आला; व आज नाशिक नगर वाङ्मयोपासक सम्मेलनाच्या प्रसंगीं ( १९-१-३० ) जमलेल्या वाङ्मयोपासकांवर त्याच लतेकडून शिशिरऋतूंतही **माधवी** पुष्पांचा वर्षाव होतांना पाहून आमच्याप्रमाणेंच स्वर्गस्थ अनंततनयास आनंद होऊन ते आनंदाश्रु ढाळतील व आमचा आनंद द्विगुणित करतील असा आह्मांला भरंवसा वाटतो.

पद्मदलाच्या प्रस्तावनेंत ह्मटल्याप्रमाणें **माधवींत** कांहीं नवीन कविकवयित्रींच्या कविता ग्रथित केल्या आहेत. वेळेच्या अभावीं इच्छा असतांही पद्मदलांतील कांहीं कविकवयित्रींच्या कविता या भागांत घेतां आल्या नाहींत याबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें. या पुस्तकांत २६ कवि व २ कवयित्री यांच्या ६४ कविता आल्या आहेत. ते सर्वच वाङ्मयविहार- मंडळाचे सभासद नाहींत, तरीही त्यांनीं आपल्या कविता आत्मीयभावनेनें मंडळाला छापण्यास संधि दिली याबद्दल मंडळ त्या सर्वांचें आभारी आहे.

सौ. कमलाबाई पाटणकर यांच्या कविता मूळ बालबोधमेव्याकरितां बालवाङ्मय ह्मणून लिहिल्या असून त्या बालबोधमेव्यांत लवकरच प्रसिद्ध व्हावयाच्या असतांही त्या कविता व चित्राचा ब्लॉक या संग्रहांत छापण्यास मेव्याचे संपादक श्री. दे. ना. टिळक यांनीं दिल्याबद्दल त्यांचें मंडळ फार आभारी आहे. सुदर्शन प्रेसचे मालक श्री. रामभाऊ गणु देवकर यांनीं आपलीं महत्वाचीं कामें बाजूला सारून हें पुस्तक आपुलकीच्या भावनेनें तांतडीनें छापून दिलें त्याबद्दल मंडळ त्यांचेंही फार आभारी आहे.

शेवटीं ज्या शारदेच्या कृपाकटाक्षांनीं या वाङ्मयलतिकेस बहर आला त्या शारदेस आपल्या कटाक्षपातांनीं या लतिकेवर विविध प्रकारचे बहर आणण्यास विनंती करून ही प्रस्तावना पुरी करतो.

नाशिक,
१९-१-३०

भा. ल. पाटणकर
चिटणीस, वाङ्मय विहार मंडळ.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०७


# अनुक्रमणिका


| कवि व कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| **१ मंजुमाधव** | |
| शारदास्तवन | १ |
| चंचलेस | २ |
| येई रे येइ गडे गोड पाखरा | ३ |
| चुकामूक | ४ |
| **२ निफाडकर** | |
| याचना आणि प्रीति | ५ |
| बोल बोल कां अबोल ? | ५ |
| निराश बालेस | ६ |
| **३ वनवसंत** | |
| हृदयशारदेस | ८ |
| कोकिलेस | ८ |
| सुहृदास | ९ |
| पोटाचा बनलो गुलाम | १० |
| **४ कुसमाकर** | |
| संध्या-तारका | १२ |
| हास्य ! | १३ |
| **५ मधुसूदन** | |
| नातवाचें गुपित | १४ |
| छोटा डॉक्टर | १४ |
| **६ व. ह. खर्शीकर** | |
| कवि आणि मत्सर | १५ |
| **७ कुसुमाग्रज** | |
| कृष्णकरीं चंद्र | १७ |
| मनोरमा | १७ |
| **८ ग. ल. ठोकळ** | |
| मराठा गडी | १९ |
| तुझ्याखातर | २० |
| **९ विद्याधरानुज** | |
| विहगविमोचन | २२ |
| **१० विनीत** | |
| प्रेमप्रदर्शन | २६ |
| उधळूं नकोस पाणी | २७ |
| **११ डॉ. प्र. शं. गुप्ते** | |
| रामाचें मंदीर | २८ |
| **१२ मनोहरमाधव** | |
| ते आले जवळी | २९ |
| **१३ फकीर** | |
| कृष्णामाईस | ३१ |
| मायेचें घरटें | ३२ |

१४ निशिगंध
वाटे मिळो पाहण्या ३३
लपवालपवी ३४

१५ ग. गो. जोशी
स्वातंत्र्यलतिका ४०

१६ दे. ना. टिळक
पांखरें तान्हीं-देवाचीं गाजिरवाणीं ४१
बालमित्रास पत्राचें उत्तर ४२
नवपुष्पाचा लय ४२
प्रभुला लाविलें परतोनी ४३
देवाचा वडीलपणा ४४
जगन्माउली ४४

१७ धों. त्र्यं. कोचरगांवकर
वसंतवैभव ४५
कंकणझंकार ४७
भवानी तलवार ४८
—स ! ४९

१८ पां. जि. सबनीस
माझी महत्वाकांक्षा ५०
हुरहूर ५१
दुर्दैवी आई ५१
प्रेमाची चिता ५३
हृदयानिवेदन ५४

१९ कै. कवि गोविंद
कै. लोकमान्य टिळकांस ५६

२० रा. ब. खाडिलकर
करुणा ५८

२१ ह. भ. प. पांगारकर
महाराष्ट्रमहोदय ६०

२२ श्री. लक्ष्मीबाई टिळक
काव्यकळी ६७
स्नानासाठीं ६८
बहिष्कृत याला आधीं करा ६९

२३ पां. ग. लिमये
प्रेम कीं निधन ७२
पोट ७३
अनंग ७३
मदिरा ७४
पतिव्रता ७४

२४ शं. दा. चौधरी
प्रभातकालीन चंद्रास ७५

२५ पुरुषोत्तम
सुशिला बाला ७७
आयुष्यांतील पहिलें दुःख ७[illegible]

२६ ना. गो. पिंगळे
‘ ही कोण ? ’ ८१

२७ सोपानदेव चौधरी
भाग्यवान भिकारी ८३
उत्कंठा ८५

२८ सौ. कमलाबाई पाटणकर
बाहुल्यांची तक्रार ८६
भातकुली ८७
सूचि, कविपरिचय, शुद्धिपत्र.

स्थळप्रत

वाङ्मय विहार मंडळाचे संस्थापक, व महाराष्ट्राचे

सुप्रसिद्ध व लोकप्रिय कवि, कै. अनंततनय

( श्री. दत्तात्रय अनंत आपटे )



यांच्या पुण्य स्मृतीस

भक्तिपुरःसर

अर्पण.

**१४ निशिगंध**
वाटे मिळो पाहण्या ३३
लपवालपवी ३४

**१५ ग. गो. जोशी**
स्वातंत्र्यलतिका ४०

**१६ दे. ना. टिळक**
पांखरें तान्हीं-देवाचीं गांजिरवाणीं ४१
बालमित्रास पत्राचें उत्तर ४२
नवपुष्पाचा लय ४२
प्रभुला लाविलें परतोनी ४३
देवाचा वडीलपणा ४४
जगन्माउली ४४

**१७ धों. त्र्यं. कोचरगांवकर**
वसंतवैभव ४५
कंकणझंकार ४७
भवानी तलवार ४८
—स ! ४९

**१८ पां. जि. सवनीस**
माझी महत्वाकांक्षा ५०
हुरहूर ५१
दुर्दैवी आई ५१
प्रेमाची चिता ५३
हृदयानिवेदन ५४

**१९ कै. कवि गोविंद**
कै. लोकमान्य टिळकांस ५६

**२० रा. ब. खाडिलकर**
करुणा ५८

**२१ ह. भ. प. पांगारकर**
महाराष्ट्रमहोदय ६०

**२२ श्री. लक्ष्मीबाई टिळक**
काव्यकळी ६७
स्नानासाठीं ६८
बहिष्कृत याला आधीं करा ६९

**२३ पां. ग. लिमये**
प्रेम की निधन ७२
पांट ७३
अनंग ७३
मदिरा ७४
पतिव्रता ७[illegible]

**२४ शं. दा. चौधरी**
प्रभातकालीन चंद्रास ७५

**२५ पुरुषोत्तम**
सुशिला बाला ७७
आयुष्यांतील पहिलें दुःख ७[illegible]

**२६ ना. गो. पिंगळे**
‘ ही कोण ? ’ ८१

**२७ सोपानदेव चौधरी**
भाग्यवान भिकारी ८३
उत्कंठा ८५

**२८ सौ. कमलाबाई पाटणकर**
बाहुल्यांची तक्रार ८६
भातकुली ८७

सूचि, कविपरिचय, शुद्धिपत्र.

स्थळप्रत

वाङ्मय विहार मंडळाचे संस्थापक, व महाराष्ट्राचे
सुप्रसिद्ध व लोकप्रिय कवि, कै. अनंततनय
( श्री. दत्तात्रय अनंत आपटे )



यांच्या पुण्य स्मृतीस
भक्तिपुरःसर
अर्पण.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६६

# मंजुमाधव.

## श्रीशारदास्तवन.

मंदारमाला.

माला ग्रहांची करीं घेउनीयां यशोगायना देवही लागले
नाहीं गणाया तरी शक्यता ती तुझ्या सद्गुणांनां महामंगले!
दारीं सदा वाजती नौबती मेघ, तारा जलाच्या तरंगावली
छेडूनि गंधर्व गाती स्तुतीपाठ ताडूनिया वायुची अंगुली.

सौंदर्य हासे जिथें तेथ भासे तुझा विश्वमूर्ते ! मयूरेश्वर
ना चांदण्याचा पिसारा फवारा उभारोनि कीं नाचतो सुंदर
शुद्धत्व जेथें डुले हंस तेथें सुहास्योपमा सत्प्रभा फाकुनी
किंवा विसाव्यास आले करांचें शरच्चंद्रिकेच्या थवे भागुनि.

जेथें घुमे वाद्य मंजुस्वना तेवि कंठातली बासरी नादते,
तेथें तुझ्या कंकणाच्या ध्वनीशीं अम्हा पामरा साम्यता भासते.
वाणी जयांची मना मोहणारी जगद्वंद्य जे धन्य वागीश्वर
धाते दुज्या सृष्टिचे पैंजणांतील देवी तुझ्या वाजती घुंगुर.

वंदू पदीं केवि ? ह्या विश्वरूपास पाहूनि मच्चित्त भांबावलें,
संध्यासुरंगी तुझ्या पादपद्मीं जिथें हासती तारकांचीं फुलें,
अर्चावया तोय आणूं कसें, मीच बिंदू तुझ्या भव्य सिंधूतला,
वाहूं सुमा कोणत्या मी स्वयं सान रेणू तुझ्या विश्वपुष्पांतला.

काव्यें रचावीं तुला आळवाया, परी सूर काढूं कसे माउली
मी साद तूं नाद मी मूकची तार श्रीशारदा ब्रह्म-वीणेतली.

याझ्या पदीं हीच मज्जीवनाची सदा नादवी तार झंकारुनी
नाचे जरी अंगुली त्वत्कृपेची जगा वेड लावील ती गायनीं.

---

## चंचलेस.

( गज्जल )

वंचना पुरे आतां निष्ठुरे दया दावी
ही व्यथा कशी बाले सांग सांग सोसावी ॥ धृ. ॥
जादु लाडकी डोळीं भावना मुखीं भोळी
ती शराब रूपाची धुंद होउनी प्यावी ॥ १ ॥
नाम सर्वदा घेई मूर्ति मानसीं राहीं
देवते तपस्या ही ना परी तुझ्या गांवीं ॥ २ ॥
तूंच कोकिला रानीं कोठुनी कटू वाणी
कां फुलांतली राणी ही कठोरता दावी ॥ ३ ॥
हास्य सर्व सृष्टीचें यौवनीं तुझ्या नाचे
साजणी किती गाणीं आळवूनिया गावीं ॥ ४ ॥
तूं मनांतली गीता साथ जीवसंगीता
तूंच कोपतां आतां दाद कुणा मागावी ॥ ५ ॥
खेळुं नको आशेसी बद्ध होउंया पाशीं
कांहिंही वदो कोणी कां फिकीर मानावी ॥ ६ ॥
ना असें जरी होणें पाहणें न प्रेमानें
याचना तुझ्या पायीं ती अखेर ऐकावी— ॥ ७ ॥
क्रूर दृष्टिपाताची वीज चंचले साची
एकदांच फेकोनी जीववेल जाळावी ॥ ८ ॥

## येई रे येइ गडे गोड पाखरा—

चाल— [ नीज गुणी बाळ झणी ]

येई रे येइ गडे गोड पाखरा!
तुजवांचुनि जीव सख्या होई घाबरा ॥ धृ ॥

गतजन्मींची ओळख जाणुनी असा
निर्भय बससी स्कंधीं काय राजसा ?
गान न तें—मंजुमधुर मुरलिरव जसा
मंदपदीं नाचसि मग प्रेमनिर्भरा ॥ १ ॥

चिद्वृत्ती प्रीतीनें वेडि जाहली
चिमुकलीच चंचू तव हळुंच चुंबिली
हृदयें निःशब्द किती बोल बोलली !
हाय ! परी विसरलासि काय निष्ठुरा ! ॥ २ ॥

आशेचें गीत न तें पूर्ण जाहलें
हृदयाचें गोड स्वप्न हाय भंगलें
बोल बुलबुला केवी मजसि फसविलें
सर्वस्वा चोरुनिया उडासि भुरभुरा ॥ ३ ॥

अमितमधुरफलपूर्णा ही वसुंधरा
रमशिल विसरुनिया मज गात सुंदरा
शोधुं कुठें जगतिं परी दीन मी खरा
स्मरुनि तुला दुःखाश्रू गळति झरझरा ॥ ४ ॥

## —चुकामूक—

[ शा. वि. ]

प्रीतीचा क्षय लागला वणवणा
पृथ्वीसभोंती फिरे;
ती तों निष्ठुर, चंद्रमा झरझरा
ताराश्रुधारा झरे ;
बाला तीहि रवींसभोंवति वृथा
वेड्यापरी धावते;
प्रेमाची असली ‘ चुकामुक ’ तुला
देवा ! कशी साहते ?

... ग्रंथ संग्रहालय
नं. ......
ता. ......

## श्री. सदाशिव वासुदेव निफाडकर.

### याचना आणि प्रीती.

याचना न कामाची । जा खुशाल माघारी
ये ह्मणून येणारी । जा ह्मणून जाणारी
प्रीत ही असे का हो? । ही जगाहुनी न्यारी १

संपदेस लाथाडी । आपदा सुखें जोडी
ही सुखास सोडोनी । दुःखभार घेणारी २

रूप गूण कांहीं ही । पाहते न केव्हांही
खूण अंतरींची जी । तीच एकली प्यारी ३

दिव्य ज्योत ती जेथें । ये दिसोनिया तेथें
तुच्छ सर्व लेखोनी । बेफिकीर जाणारी ४

आप्तपाश तोडोनी । बंधनें झुगारोनी
संकटां न मानोनी । लीन तेथ होणारी ५

भेदभाव टाकोनी । एकरूप होवोनी
डोलुनी निजानंदीं । गोड गीत गाणारी ६

नाशिक ता. ३१-१-१९२८

---

### बोल, बोल, कां अबोल?

बोल, बोल, कां अबोल? बोल बालका
आतुर हृदयें झालीं
ऐकाया तव बोली
समजुनि उमजुनि वरिला मूकभाव का! १

मौन तुझें हें जिवास
करित असे बघ उदास
झडकरि त्यजुनी छकुल्या होंइं बोलका २
अर्धस्फुट बोल जरी
संगीता ये न सरी
भान हरी, सुख वितरी ; जादुगार कां ! ३
ह्या तव बोलापुढती
काव्यें नीरस गमतीं
कोण असा कविकुलगुरु शारदासखा ! ४
हृदयांचा हा वसंत
बघ फुलला ; ये भरांत
कोकिल तूं अजुनि कसा राहिला मुका ! ५
प्रीतीच्या संगीता
तूंहि साथ दे आतां
गाउनि नव मधुर मधुर गीत गायका! ६

नासिक, तारीख २०-८-१९२८

---

## निराश बालेस.

सुखाचा काल तो बाले । विधीनें लेखिला भालीं
जरी ना प्रीतिची पूर्ती । क्षणाला आज ह्या झाली
सुखाला मोल दुःखांचें । नको का द्यावया सांग !
जगूं आशेवरी, सोसूं । हजारों संकटें आलीं
वठोनी जाय जी वेली । हिमाच्या वृष्टिपातानें
फुलोनी तीच ना आतां । वसंतीं हांसतें गालीं !

तृषेनें त्रस्त जो झाला । कधींचा, पाहतो वाट
अशा त्या चातकासाठीं । सुधेची धार ये खालीं
रवीचा साहुनी ताप । पहा ही कष्टली भूमी
प्रभू तो तोसही देतो । सुखातें त्या शरत्कालीं
वियोगें व्याकुला झाली । मुखीं ये म्लानता फार
निशीथीं, पद्मिनीच्या त्या । खुलेना प्रीतिची लाली !
सदाही मौक्तिकांचा तो । जयाला लागतो चारा
प्रभूनें राजहंसाची । नसे कां सोय त्या केली !
वियोगी होय जी बाला । जगाच्या आदिपासोनी
परी का सोडिली आशा । उषेनें, प्रीत का मेली !
वियोगें येतसे गोडी । खऱ्या प्रीतीस ना बाले !
जगाच्या बंधनांनीं कां । कधीं ती नाहिंशी झाली !
जयानें पेरणी केली । मनाच्या ह्या मळ्यामाजीं
तयाला काळजी सारी । नसे का आपला वाली !

नाशिक, ता० ३०-३-१९२९

———०———

## वन-वसंत.

( पु. वि. रहाळकर )

### हृदयशारदेस—

सखे ग मदीय हृदयासनीं
वस सदैव हे स्वामिनी ! ॥

निशिदिनीं उपाधी जरी
विकलता मना दे तरी
तिस तुझीच दृष्टी हरी । सखे ग० १

वसन हें नभाचें जरी,
पृथिविचीच शय्या, परी
हवि तुझीच संगत खरी । सखे ग० २

जन मला भिकारी म्हणे
परि तुझ्या कृपेच्या धनें
नत कुबेर लज्जित मनें सखे ग० ३

जिवलगे ! तुझ्या प्रीतिनें
सुखि खरा भला मी म्हणें
स्वर्गींचें सुखही उणें । सखे ग० ४

करि न कोप सदये ! सये !
तुज स्मरून जगते अये !
मज अधीक वदतां न ये ! । सखे ग० ५

नासिक ता. २३ एप्रिल १९२७

### कोकिलेस—

सोडूनि कोकिले ! मधु तान झणी गाई आजि आळवुनी ।
गोड गाना ऐकुनीया
विश्व जाई गुंगुनीया

हंसणार नाहिं परि कोणि तूजला श्यामलवर्णा म्हणुनी ! १
कंटकांनीं अंग भरलें
परि सुवासें रान खुललें
घे धन्य कुमारी चारुकेसरा रसिकमनातें हरुनी ! २
संकटांनीं गांजलेली
कितिक हृदयें शुष्क झालीं
ऐकूनि परी तव तान कोमला ये ओलावा फिरुनी ! ३
काक करिती काव काव
मत्सरी त्यांचा स्वभाव
परि लक्ष देउनी क्रुद्ध नको तूं दुर्वचनातें स्मरुनी. ४
सतत ताना पंचमांत
बदल नाहीं किमपि त्यांत
कंटाळुनिया परि जाइ न कोणी जाण गडे ! तूं स्वमनीं. ५
सूर नाना निघति जगतीं
सकल हृदया ताप देती
तूं एकतानता संगीतांतिल मूर्तिमती ये दिसुनी ! ६

---

## सुहृदास—

मूर्ती पाहुनिया त्वदीय सखया ! मन्नेत्र आल्हादती !
ऐकोनी मधुरा गिरा तव किती हे कर्ण संतोषती !
डोळयांन्नीं बघुनी, मनें स्मरुनिया, चित्तें तुला ध्याउनी
मित्र-प्रीति तुला सख्या ! सतत कीं घेई हृदीं ठेवुनी.

मित्रप्रीतिपुढें न अन्य कसली वाटे मला ती तमा !
माझ्या या हृदयाब्धिचा गमसि तूं मित्रा खरा चंद्रमा !
होतां त्वत्सहवास येइ हृदया माझ्या किती शांतता !
जें जें कांहीं तुझें खरोखर असें तें गोड मातें अतां.
दिव्या जी हृदयोद्भवा जगति या दिव्यत्व दे जीवतां
त्या मैत्रीविण अन्य कांहीं नलगे मातें तुझ्यापासुन !

× × ×

आहे सर्व खरें परंतु मनिं या साशंकता बोचते !
नाहीं वाटत पात्र काय तुजसि स्नेहास मी वाटतें !

## पोटाचा बनलो गुलाम —

पोटाचा बनलों गुलाम दुबळा दाही दिशा हिंडुनी
जीवांच्या झगडयामधें झगडतां हा देह कीं भागला !
धैर्यातें धरुनी कसा तरि पहा मी काळ हा कंठला
दु:खाचे धरिले प्रहार हृदयीं माझ्या असे झेलुनी
सौख्याची वसली सदैव हृदयीं आशा चिरंजीविनी.
ती ही जर्जर जाहली हळुं हळूं ! उत्साह ना राहिला
दैवानें अपमान हाय ! करुनी मज्जीव हा पोळला !
रुग्णातें जखमेंत काय सहतें क्षारोदका सिञ्चुनी !
ऐशाही बिकट स्थितींत पुढति मद्ध्येय सूर्याकडे
जातां आक्रमुनी पथा क्षितिज ही वाटे पळालें दुरी !

रो. ३१०५
३८६



[illegible]वारी नयनांस ये भयकरा ! चित्तीं [illegible] !
हा ! हा ! मी हतभाग्य दीन बन[illegible] ! [illegible] म[illegible]नी [illegible].

बाले ! त्वन्मुखचंद्रमा चमकतां उत्साह नाचे मनीं ।
तैसे नेत्रकटाक्ष चारु सुटतां स्फूर्ती हंसे जीवनीं ।

नासिक. ता. १६ जानेवारी १९२६.

## कुसुमाकर

[ श्री. व. कृ. हेबळे. ]

### संध्या–तारका !

[ चाल— चंद्र चवाथिचा ]

प्रीतिची कळी
हृदयिं उमलली
येइल हृदयेश ह्मणुनि रजनि रंगली ! १

मूल चिमुकलें
पदरिं लपविलें
दिवसा जें रजनीनें, —दृश्य जाहलें ! २

कृष्ण कुंतलीं
खोविली कळी
जिंकाया हृदयेशा कीं कुणीतरी ! ३

निर्जनीं वनीं
पसरि मोहिनी
एकान्तीं मुग्ध मधुर बालिका कुणी ! ४

काव्य--कल्पना
मधुर भावना
गात बसे स्मित--वदना कीं सुरांगना ! ५

———०———

# हास्य !

[ मालिनी ]

उडुगण हंसरा हा हांसवी यामिनीला
वितरि हंसत तैशी चंद्रिका कौमुदीला;
खळखळ जलवन्ती वाहतां मंजु हांसे
पवन धरुनि ताला हांसतो पर्णि भासे ! १
फुलवि सकल सृष्टी गोड ती हास्य-वृष्टी
सुखवित जनदृष्टी-कोणि राही न कष्टी !
हुरहुर परि लागे माझिया कां मनाला ?
हंसवु मज शकेना सृष्टिची हास्यमाला ! ! २
श्रुतिपथिं जरि येई नाद तो शृंखलांचा,
करुणरव तसा कीं दीन या हिंदभूचा,
मुदित सकल होतो विश्वही मंजुहास्यें
मजसि परि कधींही हास्य येईल कैसें ?

# मधुसूदन.

## मधुसूदन विष्णु गोखले.

### नातवाचें गुपित.

‘ आदी मी लपतों इथें, कथुं नका, येते धराया गुनी ।
मी आलों तुकवून लांब तिजला बागेंत त्या ताकुनी ’॥
बोलोनी लपला तिथें जवळ तो पोत्यांमध्यें शंकर ।
येतां ती हसुं ये तयास म्हणुनी तोंडास लावी कर ॥ १ ॥
शोधी ती इकडे तयास तिकडे तो ना तिला सांपडे ।
दाराआड बघे दिसे न तिजला जातांच पोत्याकडे ॥
‘ नाहीं तों ग इतें पहा ग तिकडे ’ आंतून तो बोलला ।
काढूनी हसली गुणी, हसत तो खेळावया धांवला ॥ २ ॥

---

### छोटा डॉक्टर.

‘ झालें काय अबा अले तुज असें ! ’ ‘ पोटांत येतें कळ ’ ॥
तो पोटावर हात ठेवुन वदे ‘ पोटांत येतें कल ? ’ ॥
मारि तो टिचक्या जणूंच बनला मोठा बडा डॉक्टर ।
दे सोडा - जल त्या पिण्यास वरती बोले मृदू उत्तर ॥ १ ॥
‘ घे ! घे ! औषध गोल हें बहुत ले वाटेल आतां बलें ।
‘ नाहीं यांत कडू मुली लवभली आहे जणूं खोबलें ॥
‘ माझा बाल गुणी बहू मज गमे आज्ञा न मोली कधीं ’ ।
झाला जो मज मोह पाहुनि तया तैसा न पूर्वीं कधीं ॥ २ ॥

---

## वसंत हरी खर्शीकर.

### कवि आणि मत्सर.

### शार्दूलविक्रीडित.

कवि— “ रे मूढा ! तव नांव काय ? मजला रागावुनी पाहशी ?
कां मी त्वत्कृति पाहुनीच हंसलों ? कां पाडिलें त्वां फशीं ?

मत्सर— “ आहे षड्रिपु-अग्र मी ; जनहृदीं मी पाडितो हीं घरें
माझें “ मत्सर ” नाम ”—

कवि— “ ऊद्यम तुझा तो सांग सारा त्वरें.”

मत्सर— “ गर्वाचा तरता जिना चढुनियां माडीवरी बैसतों
तेथोनी जन कोण काय करिती हें सर्व न्याहाळितों
अन्योत्कर्ष मला न साहुनि कधीं, आठ्या कपाळावरी
घालोनी हृदिं मी फुका जळफळें यत्नें मुखा सांवरी
डोळे रुंद करोनि त्यां बघुनियां खाऊं गिळूं कां असें
होतें मत्प्रति ” ---

कवि— “ कां उगा पडशि ह्या फंदांत ” ?

मत्सर— “सांगू कसें ?

आहे ह्यांत, कवे, मला सुख किती ह्याची तुला कल्पना
आली कीं ह्मणजे कृतार्थ समजें माझी, सख्या वल्गना
कोणी निंदिति, वंदिती मज कुणी, “द्वेष्टा” ह्मणोनी किती

## मधुसूदन.

### मधुसूदन विष्णु गोखले.

### नातवाचें गुपित.

‘ आदी मी लपतों इथें, कथुं नका, येते धराया गुनी ।
मी आलों तुकवून लांब तिजला बागेंत त्या ताकुनी ’॥
बोलोनी लपला तिथें जवळ तो पोत्यांमध्यें शंकर ।
येतां ती हसुं ये तयास ह्मणुनी तोंडास लावी कर ॥ १ ॥
शोधी ती इकडे तयास तिकडे तो ना तिला सांपडे ।
दाराआड बघे दिसे न तिजला जातांच पोत्याकडे ॥
‘ नाहीं तों ग इतें पहा ग तिकडे ’ आंतून तो बोलला ।
काढूनी हसली गुणी, हसत तो खेळावया धांवला ॥ २ ॥

---

### छोटा डॉक्टर.

‘ झालें काय अबा अले तुज असें ! ’ ‘ पोटांत येते कळ ’ ॥
तो पोटावर हात ठेवुन वदे ‘ पोटांत येतें कल ? ’ ॥
मारी तो टिचक्या जणूंच बनला मोठा बडा डॉक्टर ।
दे सोडा - जल त्या पिण्यास वरती बोले मृदू उत्तर ॥ १ ॥
‘ घे ! घे ! औषध गोल हें बहुत ले वाटेल आतां बलें ।
‘ नाहीं यांत कलू मुली लवभली आहे जणूं खोबलें ॥
‘ माझा बाल गुणी बहू मज गमे आज्ञा न मोडी कधीं ’ ।
झाला जो मज मोह पाहुनि तया तैसा न पूर्वी कधीं ॥ २ ॥

---

ग्रंथ संग्रहालय
नं.........
ता.........

वसंत हरी खर्शीकर.

## कवि आणि मत्सर.

### शार्दूलविक्रीडित.

कवि— " रे मूढा ! तव नांव काय ? मजला रागावुनी पाहशी ?
कां मी त्वत्कृति पाहुनीच हंसलों ? कां पाडिलें त्वां फशीं ?

मत्सर— " आहे षड्रिपु-अग्र मी ; जनहृदीं मी पाडितो हीं घरें
माझें " मत्सर " नाम "—

कवि— " ऊद्यम तुझा तो सांग सारा त्वरें."

मत्सर— " गर्वाचा तरता जिना चढुनियां माडीवरी बैसतों
तेथोनी जन कोण काय करिती हें सर्व न्याहाळितों
अन्योत्कर्ष मला न साहुनि कधीं, आठ्या कपाळावरीं
घालोनी हृदिं मी फुका जळफळें यत्नें मुखा सांवरी
डोळे रुंद करोनि त्यां बघुनियां खाऊं गिळूं कां असें
होतें मत्प्रति "—

कवि— " कां उगा पडशि ह्या फंदांत " ?

मत्सर— "सांगू कसें ?

आहे ह्यांत, कवे, मला सुख किती ह्याची तुला कल्पना
आली कीं ह्मणजे कृतार्थ समजें माझी, सख्या वल्गना
कोणी निंदिति, वंदिती मज कुणी, "द्वेष्टा" ह्मणोनी किती

संबोधूनि मला वृथा डंवचती, मातें न त्याची क्षिती
" निंदा " मात्र मदीय सुप्रियतमा देते दुजोरा मला
मीही तीस करोनियां निकटशी दंडीं सुखें उज्ज्वला
माझा काळ असाच जाइ जगतीं, माझी हर्मी घेत मी
गाजी मी दुसऱ्यावरी, जरि नसे राजी स्वनिंदोद्धमीं "

——×——

# कुसुमाग्रज

## ( श्री. ग. रं. शिरवाडकर )

### कृष्णकरीं चंद्र

( चाल:—डोळे हे जुलमि गडे— )

" सोड सख्या मार्ग झणीं चंद्र उभा डोइवरी "
" डोइवरी ? छे ग सखे, चंद्र उभा कृष्णकरीं "
" बोल तुझे कांहितरी
अर्थ न त्या तीळभरी
कृष्णकरीं चंद्र कसा नवल मला गे बाई "
" नवल कसें हें बघ तें " कृष्ण मुखा करिं घेई.
" सोड सख्या रात्र किती वेळ पहा जात फुका "
सप्तमिच्या चंद्रकरीं काव्य घडें हें रसिका.

---

### मनोरमा.

कृष्ण ढगांच्या गर्दीमधुनी वीज रुपेरी चमकावी,
व्यवहारावर मोदश्रेणी मनोरमेनें चढवावी.
संसारांतिल अडव्या वाटा फत्तर हृदयाला बनवी,
या खडकावर प्रेयसलेणीं मनोरमेनें खोदावी.
उंच उभारी मनीं मनोरा ढासळुनी तो परि जाई,
अवशेषांवर स्मृती तरंगे मनोरमेनें नुरवावी.

बेसूरांची बरकत भोंती बाह्य जगाला ती भरवी,
हृदयामधली मंजुल वीणा मनोरमेनें छेडावी.
अंधाराचा समुद्र भोंती अंतर अंधारें भरवी,
त्याच्या आधीं शांत कौमुदी मनोरमेनें पसरावी.
स्नेहजलाच्या दुर्मिळतेनें करपुनि जाई हृन्नलिनी,
सुधा शिंपुनी मनोरमेनें फुलवावें त्या चिरंतनीं.

——○——

## श्री. ग. ल. ठोकळ

### मराठा गडी.

#### वृत्तः—मंदारमाला

ज्याच्या शिरीं पागुटें फाटलेलें, जुनी जाड खांद्यावरी घोंगडी,
ज्याच्या असे अंतरीं भाव भोळा, जयाचें असे बोलणें रांगडी,
ज्याला रहायास साधीसुधी ती असे खिडखोऱ्यामधें झोंपडी,
हातावरी घेउनी मस्तकाला रणीं झुंजला तो मराठा गडी.
पोटास ज्याच्या मिळे एकवेळा सुकी कोरडी खायला भाकरी
केली इमानास जागून ज्यानें मराठी स्वराज्यामधें चाकरी,
पाऊस वारा जयाला न जाचे, जयाला असे भूमि ही अंथरी;
युद्धामधें कोयत्यानें तयानें अरींचीं शिरें झोकिलीं अंबरीं.
आतां कुठें पूर्विचा तो मराठा जयानें स्वराज्यास संरक्षिलें?
आतां कुठें तो जयानें स्वतांचें असे रक्त युद्धांमधें सांडलें?
कांडी फिरे यक्षिणीची कशी ही यशोदेवता जाय देशोधडी?
दास्यामधें गुंतला देश आतां, दडाला कुठें तो मराठा गडी?
शेतांमधें औत जुंपून आतां करी तो मराठागडी शेतकी,
झाली जरी पायबंदी, तयाची अशी, सेवितो मायभू सारखी;
मारूनिया टक्करा संकटांना खपे तो जमीनीमधें आपुल्या,
हत्तीपरी शक्ति अगांत खेळे, कृतांतासही दाखवी वाकुल्या.
स्वातंत्र्य जिंकून आणावयाला मराठ्याविना शक्त नाहीं कुणी,
आतां असे लाभली योग्य संधी, पुढें येतसे अंग तो झाडुनी
लागे दिसूं चेतलेला, निखारा निघूं लागली राख एकीकडे;
ज्वालामुखी लागला पेट घ्याया, धडाडून बाहेर लाव्हा पडे.

लागे सरूं घोर अंधार आतां, फुटूं लागलें तेज पूर्वेतुनी,
स्वातंत्र्य नांदेल देशांत माझ्या मराठाच आणील तें जिंकुनी.

## तुझ्याखातर.

किति फिरूं सख्या मी तुजकरितां ?
हा विटून गेला जिव पुरता.
बावरलेल्या हरिणीवाणी
वणवण फिरल्ये रानोरानीं
जुमानिलें नच पाउसपाणी
किति वलांडिल्या डोंगर सरिता !
सर्वस्वावर पाणी ओतुन
संसाराला काडी लाऊन
आलें धावत मी तुजमागुन
तरि न कां भरवसा ये धरितां ?
हृदयाला या कीड लागली
नजर कशी अंधारून गेली
पायांची तर चाळण झाली
जिव ढ्हाळला फिरतां फिरतां
मी हरळी तूं सुंदर कुंदा
मी फांदी आणिक तूं बुंधा
मज शेवंतीच्या निशिगंधा
किति तुझी आठवूं सुंदरता ?

गावाबाहिर नदिकांठावर
घालविलेल्या सांजा सुंदर
विसरलास कां इतक्या लौकर
कां घडा प्रीतिचा करिसि रिता?
कुठेंहि असला तरि तुज शोधिन
पायावरतीं डोकें ठेविन
खुशाल नंतर डोळे झाकिन
हा जीव ठेविला तुजकरितां.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २६६६
ग्रंथ शाखा (स्थळ ...)

# विद्याधरानुज

## श्री. देव

## विहगविमोचन

जन्मठेप झालेल्या एका हिंदवीराची सुटका झाली त्या प्रसंगाला अनुलक्षून प्रस्तुत कविता लिहिली होती

[ चाल—अर्धतनु वारुळीं बुडाली ]

कवि—

व्योमविहारी ! स्वेच्छाचारी ! द्विजोत्तमा, ये क्षणीं ।
सुहृदा ! बघु दे तुज लोचनीं ॥
पुरे पुरे तव उंच भराऱ्या, येइ घरा परतुनी ।
विरहे झुरते तव कामिनी ॥
किती दिवस ते किती मास ते किती वत्सरें अरे ।
तिनें तव वाट पहावी बरें ? ॥
निशिदिनिं तुज ती भिरभिर बघुनि शोधी विजनीं जनीं ।
स्फुंदते, येइ कंठ दाटुनी ॥
[ चा० ब० ] तूं स्वातंत्र्यगिरीचें काय शिखर गांठलें ?
वद तिथें काय शिवसाम्राज्या पाहिलें ?
म्हणुनि कां येथिचें स्मरण न तुज राहिलें ?
असो ! जाहलें होउनि गेलें, परि मी विनवी तुला ।
विहगा ! दर्शन दे प्रेमला ॥ १

विहंगः—

“ प्रिय सुहृदा ! कविराया ! मजला प्रेमें त्वां वाहिलें, ।
तेणें मन्मन संतोषलें, ॥
मत्प्रिय-जननी-दास्यविमोचन-चिंता एकचि मनीं ।
वाहिली होती मी निशिदिनीं; ॥
तिला पहावें बंधमुक्त ही आस जिवाची पुरी ।
वदली होती मम वैखरी ; ॥
सुखार्थ तीच्या तिच्याच करितां चढलों मी गिरिवरीं ।
घेतली उडीहि रत्नाकरीं ; ॥
मी जननीचिंतन करितों जों तेथुनी
तों अवचित मजला एकाकी गांठुनी
पकडुनि पंजरीं ठेवियलें कोंडुनी ,
प्रिय जननीचें दर्शन घ्याया गीतें तिज गावया
पारधी बंदी करि मज सया. ॥ २
मला वाटलें असंख्य सुतही असती मम जननीला ।
झटातिल सुखवाया ते तिला ; ॥
प्रिय जननीस्तव गृहदारावरि तिलांजली देउनि ।
राहिलों विपिनांमधिं जाउनी ॥
स्वैर भराऱ्या गोड लकेऱ्या जननीस्तव मारिल्य ।
सुहृदा ! सुखवाया मी तिला ; ॥
अजूनि कथितों नच सोडियलें , छळणा आहे खरी ।
सुटका झाली परि ना पुरी , ॥

मज स्वैरपणें संचार कराया न ये ,
माय-भू-विमोचन-गीतें गातां न ये ,
त्या दुष्ट पारध्या मज टोंचाया न ये ,
मुक्त जरी परि बांधियलेला , दोरी त्याच्या करीं ।
समज तूं कुटिल नीति ही खरी ! ” ॥ ३
असो, परिसिला संवाद असा कविविहगाचा जधीं ।
मूर्च्छना ये जननीला तधीं ; ॥
दोष देउनी दुर्दैवा ती करी ईश-विनवणी ।
नको परदास्याची कांचणी; ॥
गुणी बाळ जन्मास घालुनी नेसीं मजपासुनी ।
दयाळा ! कठोरता दावुनी ; ॥
विहंग माझा कुठें लपाविसी सांग मला ईश्वरा ।
मांडिसी तूंही छळ मम पुरा ; ॥
परि हीरक चमके कुठेंहि असला तरी,
अग्निचा स्फुलिंगाचि जाळी विपिना तरी,
कीं कोंडियला जाळींत बाल केसरी—
विकलतनू जरि झाला तरि तो किरीटिगंडस्थळा ।
फोडिल सुटतां तो मोकळा ॥ ४
धीर असा हा देउनि चित्ता मत्सांत्वन मी करी ।
ठेवुनि भार तुझ्यावरिं हरी ॥
कुठेंहि असला तरी दयाळा दीर्घ आयु देउनी ।
राखी सुखी त्यास निशिदिनी ; ॥
द्विजकुल-तारक-भूषण मज तो कीर्ती त्याच्यावरीं ।
ढाळिते छत्रचामरें बरीं ॥

ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........

मत्स्वातंत्र्याच्या मुकुटांतिल तो मणी,
तत्तेज देखुनी दिपतो तो दिनमणी,
जरि असेच निघतिल सुत सर्वहि सद्‌गुणी,
नुरेल चिंता मज रघुनाथा ! होउं कृपा तव खरी ।
जाइल दास्यहि सत्वर दुरी ॥ ५

# विनीत

## " प्रेम-प्रदर्शन "

होती कोमल एक गोड कलिका वेलीवरी शोभती,
वायूनें बघुनी तिला खुलवितां मुग्धा तदा हांसती,
हास्यानें वितरी सुगंध, सुखवी वायू प्रमोदें नटे,
प्रेमाची असली खुलावट जगीं तो सांगतांना फिरे.

× × ×

प्रेमाचा परिणाम घोर असला हें प्रेम-दिग्दर्शन;
होतां नष्ट सुवास—हाय ! कलिका जाणार कोमेजुन ॥ १ ॥

× × ×

जीवाची कलिका सुरम्य सखये ! माझ्याच तूं हांसरी,
नाना भाव मनीं तुझ्या उमटतां होशी जरा बावरी.
प्रेमाचीं वचनें अतीव सुखदे ! नेत्रीं तुझ्या बोलती
घेई झांकुनि पाकळ्या हृदयिं तीं सांठीव गे संप्रती.
प्रेमाची कलिका - सदैव कलिका मुग्धे ! जगीं या रहा.
भाग्याची उजरी अशीच उजळो; मी भाग्य-शाली अहा ! ॥२॥

## " उधळूं नकोस पाणी. "

खेळे जलाशयाशीं । उधळीत प्रेमराशी
रमणीय रम्य वाला । सुखवील जी सुखाला. १
प्रतिबिंब मुग्धतेचें, । कीं हास्य यौवनाचें,
स्वारस्य स्निग्धतेचें । वदनीं विलासिनीचे. २
भवतालि चंद्र फिरके । उडती तुषार मोदें.
सौंदर्य खेळ खेळे । मन मूक भाव बोले. ३
उधळूं नकोस पाणी, । उधळूं नकोस वाणी,
हृदयीं उचंबळावें । नयनांत सांठवावें. ४
तें प्रेम गोड गोड । उधळूं नकोस वाले.
तव पाद-पद्म नाचे । उधळीत मोति साचे; ५
लडिवाळ मोति-पाणी । परते हळूच चरणीं.
मम प्रेम दीनवाणी । परतेल ह्याच नयनीं. ६
हुरहूर या मनाला । लहरी जशा मनाला,
विनती तुला ह्मणोनी । उधळूं नकोस पाणी. ७

## डॉ. प्र. शं. गुप्ते

### " रामाचें मंदीर "

ताईलील खेळ खेळती, मंदिर रामाचें
दगड मांडुनी त्यांनीं केलें सुंदर गमतीचें.
राम लक्षुमण वस्त्रें नेसुनि उभे राहिले धीट
सीतादेवी गुलाबि पातळ नेसुनि झाली नीट.
बाळ आमुचा दो वर्षांचा होता भारी गुंड;
खेळत आला देवांजवळीं चोरुनि लुच्चा बंड;
लुसलुसीत कर, घारे डोळे चमकत होते फार;
आनंदाचा पुतळा होता, गाल गुलाबी लाल.
हळूच उचलुनि सीता, बाळू चालूं लागे नीट.
ताईलीला गोंधळ करिती, "रावण झाला धीट."
"धांव, धांव, रे दादा, अमुची सीता नेली दूर
लुटलुट पळतो लुच्च्या बाळ्या जैसा रावण क्रूर.
दादोबांची स्वारी आली घेउनि हातीं तीर.
" कोठें गेला रावण तुमचा उडविन त्याचें शीर. "
जाउनि त्यानें सीता आणिली बाळाच्या हातून;
ताईलीला हर्ष पावल्या सीतेला पाहून.

# मनोहर-माधव

## ते आले जवळी —

ते आले जवळी नि कानगुजले, हातीं करा दाबुन-
' लीले ! हें अवसान सोड उसनें ! हं बोल गे हांसुन ! '
' नाहीं ! ' मी झिटकारिलें, वदन अन् हातांत जों झांकलें,
त्यांनीं काढुन हात बाजुस हळूं, बोलावयां लाविलें;
आणी राहत ते उभे लगटुनी—' नाहीं बरें चांगलें---
जा जा येथुन ! ' मी असें ह्मणत तों, नाहीं मुळीं हाललें !

ते आले जवळी नि कानगुजले हातीं करा दाबुन-.
' लीले ! हें अवसान सोड उसनें ! पाहीं जरा रोंखुन ! '
' नाहीं ! ' मी झिटकारिलें, नयन अन् हातांत जों झांकिले,
त्यांनीं काढुन हात बाजुस हळूं पाहावया लाविलें.
आणी राहत ते उभे लगटुनी-- ' नाहीं बरें चांगलें—
जा ! जा ! येथुन ' मी असें ह्मणत तो नाहीं मुळीं हाललें !

ते आले जवळी नि कानगुजले, हातीं करा दाबुन --
लीले ! हें अवसान सोड उसनें ! देई गडे चुंबन ! '
' नाहीं लाज ? ' न हाललें लव, करां गालांवरी ठेविलें,
त्यांनीं काढुन हात, ओढुन मला प्रेमें बळें चुंबिलें !
—आणी राहत ते उभे लगटुनी—' नाहीं बरें चांगलें—
जा ! जा ! येथुन ! ' मी असें ह्मणत तों नाहीं मुळीं हाललें !

× × ×

ते आले जवळी नि कानगुजले, हातीं फुलें घेवुन—

' लीले ! सुंदर हीं फुलें मम करें वेणीत मी खोविन ! '
' आहे तुच्छहि पुष्पगुच्छ ! ' म्हणतां मालाच कंठांतुन—
घेवूनी स्वकरें त्वरें निखुनियां गेलांत संतापुन.
' ये ! राही लगटून खेटुनि उभा, आलिंगुनी चुंबुनी !
ये ! कांहीं कर तूं गंड ! परि अतां ये प्रेमला धांवुनी. । '

# फकीर

## प्रभाकर कृष्ण सोहनी

### " कृष्णामाईस "

कृष्णातीरिं सदाच वास मिळुंदे, तो स्वर्ग आह्मां नको.
कृष्णेचें जल प्यावयास मिळुंदे. वाटे, सुधाही नको.
आकाशांतिल चंद्र सूर्य अवघे, तारा नको देखण्या;
शिंपा शंख बघोनि येथिल पुरा तो मोद आहे मना.
कृष्णेच्या तर रम्य तीरिं फिरणें पात्रीं सदा डुंबणें,
होता बालपणांत खेळ असला, तों गोड होतें जिणें !
कृष्णेचें पण पात्र येथ दिसतें कां शुष्क अन् कोरडें ?
वाहे कां न खळाळुनी, तर पुढें ही चालते नाचते ?
तीरांनीं तर चालुनीच पुढती पाहूं हिला निर्मळ
पात्रीं जी भरुनीच रम्य दिसते, आहे कुठें ही स्थिर ?
आतां शुष्क न कोरडी दिसत ही पात्रीं भरे गंभिर,
प्रेमानें सुखसागरास मिळुनी ह्या संगमीं सुंदर.
कृष्णेचे जल तें सुधाच मिळतां—जीवा सदा प्यावया,
आम्हीं शाहिर गोड नित्य कवनें गाऊं तिच्या पूजना !

## " मायेचें घरटें "

प्रेमाचे मृदु तंतु सर्व अणखी धागे जिवाचे मृदु,
ओवोनी घरटें तुवां बनविलें माते! किती हें मऊ ?
प्रेमाचा मज चारुनी निशिदिनीं चारा तुवां चंचुनीं
माते ! त्वां मज ज्ञान जें शिकविलें बोधामृता पाजुनी.
मायेच्या विरहें जगांत झुरतो हा बाळ पक्षी तुझा !
आला सोडुनि हा चुकोनि घरटें केव्हां उडोनी कसा ?
आशेचा न इथें कदापि फिरतो वायू, निराशा पुरी !
ऐशा घोर वनांत पक्षि झुरतो, माते ! तुझा हा मनीं !

# निशिगंध.

## वाटे, मिळो पाहण्या.

कामें आटपुनी, श्रमूनि अगदीं आलीस तूं जधवां,
होतों वाचत अंक तो सहज मीं रत्नाकराचा नवा.
" चालू वाचन ना सदा ? न अगदीं वेळा वयाला सुचे "
चाले जों कुरकूर ही तव अशी, तों झोंपही येतसे.
बाहूचें उपधान या करुनियां होतीस तूं निद्रित;
श्वासोच्छ्वासहि मंदमंद सखये ! होता तुझा चालत.
ज्योत्स्ना ती नभिंची मुखावर तुझ्या येई गवाक्षांतुनी;
भेटाया तुजला सखी तव गमे ये अंतरिक्षांतुनी.
" आहे चित्र उदात्त याहूनि दुजें लोकीं असें कोणतें ?
प्रीतीच्या परिरम्भणीं सुखभरें विश्वास नांदे जिथें.
देवा ! दे मज शक्ति योग्य इतुक्या प्रेमास या व्हायला."
होतों कांहितरी असें वदत मी, तों जागृती ये तुला.
ओशाळून हळूच बोलसि, " न कां केलेंत जागें मला ?
झाला वेळ किती ? असेल अपुला हा हात भारावला ! "
तेव्हां उत्तरलों; " विचार असला आतांच कां येतसे ?
आहे जन्मवरी न काय धरणें हें गोड ओझें असें ? "
" हो ! आह्मी ह्मणजे सदैव पुरुषां ओझेंच ना वाहण्या ? "
तूं रागें वदलीस तें फिरुनियां वाटे, मिळो पाहण्या.

## लपवालपवी.

[ छंदः—प्राची अक्षरसंख्याक. ]

पौर्णिमा-रजनी प्रशांत मोठी,
करीत बसलों प्रेमाच्या गोष्टी;
विषय संपे न आधीं,
वेळही पुरे न कधीं;
कथेच्या प्रवाहीं गेलोंसें कोठें,
भान न राहिलें आह्मां मुळीं तें. ( १ )

बोलतां बोलतां म्हणे मी तिला;
" विचारावयाचें कांहीं तुजला;
लपवालपवी नाहीं
करावयाची मुळींही;
वदे ती, " तुह्मांला ज्ञात नसें जें.
आहे कां कांहींहीं उरलें माझें ? " ( २ )

" कोणास ठाउक ? " हृदय स्त्रीचें
अगाध,' असेंच मत जगाचें ;
असो तें ! सांग तूं असें—
विवाहानंतर कसें
असावें आयुष्य तुजला वाटे ?
आणिक मिळालें काय तुला तें ? " ( ३ )

घालूनि खालतीं आपुली मान
क्षणैक विचारामध्यें हो मग्न
बोलाया लागे ती परि,
हळूंच मृदुशा स्वरीं,
" सांगावें तुह्मीच आधीं तें मला;
मागूनी सांगेन मीही तुह्मांला. " ( ४ )

आणिक ध्यानांत ये माझ्या आतां,
प्रश्न न तितका सोपा तो होता.
गोंधळ झाला मनाचा,
शब्दही येईना वाचा;
करूं गेलों एक, हो भलतेंच.
मलाच उलटा पडला पेंच. ( ५ )

धरूनियां तेव्हां धीर तथापि
कराया लागलों मी थापाथापी.
" काय मी सांगूं सखये ?
सांगाया परी तें नये !
तुझियासंगतीं आज हें जसें
जीवन चाललें, तसेंच तसें. ( ६ )

चांदण्या रात्रीचें बैसावें असें,
विमल चंद्रिका जेव्हां ती हसे;
जग हें विरूनि जावें,
तुवांच सारें भरावें;

अखेर रहावें तूं आणि मीच
तूं देवी माझी, मी भक्त तुझाच " ( ७ )

संगति शब्दांत आहे कीं नाहीं;
बोधही अर्थाचा होत कां कांहीं;
    लक्ष न तिकडे माझें;
    वदनीं तिच्या विराजे—
—हास्य,—नी थांबलें व्याख्यान माझें;
आणिक हवेंत शांतता राजे. ( ८ )

हंसत वदे ती, " आवड जुळे—
अपुली इतकी कशी ? न कळे;
    जीवन आज जसें हें
    आपुलें चाललें आहे,
अगदीं तशीच कल्पना माझी
वागत होती या हृदयामाजीं. ( ९ )

चांदण्या रात्रींचें बसावें असें,
विमल चंद्रिका जेव्हां ती हंसे;
    जग हें विरुनी जावें,
    तुझीच सारें भरावें;
अखेर रहावें तुझी नी मीच,
तुझी देव, दासी मी अपुलीच " ( १० )

माझ्याच अस्त्रानें मी पराजित
अबलेकडूनी झालों ना ! हन्त ?
जेथुनी आम्ही निघालों,
तेथेंच फिरुनी आलों.
हृदय कोणाचें कळलें नाहीं;
लपवालपवी केली दोघांहीं. ( ११ )

कळूनी चुकलें तथापि कैशा
अपुऱ्या राहिल्या आशा आकांक्षा;
हवेंत विरलीं ध्येयें,
मनास स्वस्थता नये,
आणि मी हृदयीं होऊनी खिन्न
बोलाया लागलों स्वरें विषण्ण. ( १२ )

" दिसे ना कोणाला ? इच्छा तुझ्या त्या
सफल जाहल्या अशा कोणत्या ?
समाजसेवा करावी,
अबलादु:खें हरावीं,
वाङ्‌मयामध्येंही ठेवावें नांव;
होती ना तुझी ही मनाची धांव. ( १३ )

होऊन संबद्ध माझ्याशीं सारे—
विफल मनाचे झाले मनोरे.
मिळालें जरी तें प्रेम,
पुरलें परि न काम;

स्वतःच्या संसारामधेंच जीव
शिणला, मिळेना ध्येयाला वाव "( १४ )

अडवी मधें ती आणिक ह्मणे
मजला अगदीं गंभीरपणें.
" प्रेमाची एकच आशा,
दुजी न आह्मां आकांक्षा;
वेगळें पुरुषां प्रेम नी ध्येय;
प्रेमच आह्मांला ध्येय तें होय. ( १५ )

प्रेमानें आपण एक ना झालों ?
आणखी त्यांतच रंगुनी गेलों.
कशास इतर गोष्टी !
उगाच व्हायचें कष्टी !
नको तें मिळालें नाहीं म्हणूनि
करावा कशास शोक बुधांनीं. " ( १६ )

मधेंच वदलों तेव्हां मी तिला.
व्याख्यान तुझें हें कळेना मला. "
रागानें उत्तर येई,
" कळावयाचें न कांहीं—
तुमचें मला, नी माझें तुह्मांस.
मी आहे स्त्री आणि तुम्ही पुरुष. ( १७ )

थांबला तेथेंच तेव्हां तो वाद.
अजूनि मला तो कळेना भेद.
एवढें मात्र कळालें:—
' ध्येय न साध्य जहालें
म्हणूनी करीत राहिलों आम्ही
लपवालपवी आजवरी ही. '

## श्री. ग. गो. जोशी

### स्वातंत्र्य–लतिका.

विद्युत्तेज-लता नभीं चमकली मेघोदकीं जन्मली
दिव्यांगें नटली, रवी शशि सुमें तेजोनिधी पातली
व्यापी सर्व जगा चराचर भितें जें अंतरीं कांपतें
सांगे, कोण तिला करांत धरितो **श्रीसच्चिदानंद** तें. १

वाहे निर्झरिणी विलास-रमणी गाणें मुखें गाउनी;
वन्यश्री खुलवी, दरीस फुलवी वासंतिका सेवुनी,
तेथें खेळति वा निसर्ग-लतिका बाळें मृगांचीं मुदें;
गेलें वैर विरून सर्व लपलें, आनंदलीं चिन्मुदें. २

पुष्पांच्या लतिका वनीं उपवनीं श्री शारदा डोलवी;
गाती भृंग मुदें रसाळ कविता मात्रा-गणां लाजवीं;
होतो लग्नविधी मरुद्गण-करीं पुष्पें फळें डोलती.
सृष्टी ही रमते निसर्ग-लतिका काव्यांजली वाहती. ३

स्वातंत्र्यें शुक-सारिका विहरती, कुंजामधें रंगती;
गाती मोदभरें रसाळ कवनें, संवेदना डोलती;
स्नेहाच्या लतिकांवरी विरमती स्वातंत्र्य-सूर्योदय
होतां प्रीति-लता प्रफुल्ल दिसती गावा सदा चिन्मय. ४

माता भारत-भू-लता विकसली येती फळें गोजिरी
पुष्पें सुंदर हीं, सुरेख फुलली चिन्मंदिरीं साजरी.
लेई " लाल " ललामभूत हृदयीं हारावली सोज्वल;
गाती मोदभरें रसाळ कवनें चिद्भावना निर्मल. ५

# देवदत्त नारायण टिळक

## पांखरें तान्हीं–देवाचीं गोजिरवाणीं

( चाल—धरी रे ध्यानीं--- )

पांखरें तान्हीं देवाचीं गोजिरवाणीं ॥ धृ. ॥
    नका तयांना दुखवूं कोणी ।
    नका दचकवूं तयां भिववुनी ।
    ऐका परि चोरुन मधु गाणीं ।
लपुनी छपुनी । ठेवा हो चारापाणी ॥ १ ॥

    मृदू मृदुलता अंगीं खेळे ।
    रंग इंद्रचापांतुनि निखळे ।
    क्षणभर जागें स्वप्नचि झालें ।
आलिं जणुं येथें । कोशल्यें एकवटोनी ॥ २ ॥

    वाऱ्यावरलें तरतें सुमन ।
    ऐसें हें पांखरु एक क्षण ।
    हातावर मम बसलें येउन ।
    मुगुट राजाचा । त्यापुढें तुच्छ मी मानी ॥ ३ ॥

## बालमित्रास पत्राचें उत्तर

( चाल—कांहींशीं ' जयजय जगदीशा ' ॥ प्रमाणें )

तुझें पत्र आलें । पाहुन हसूं फार आलें ॥
डाग तयावरचे । वाटती ढग आकाशींचे ॥
मधें चंद्रकोर । चांदण्या चहुंबाजुस चार ॥
कीं युद्धच चाले । अक्षरांचें दळ जणुं हाले ॥
वीर अक्षेर तीं । लढतां लढतां कीं पडतीं ॥
शाईचे बुरखे । शब्द घेउन मारिती मुरके ॥
पडद्यांतील बिबी । बनविल्या दाखवितीं न छबी ॥
असो विनति आतां । चुकुं नको पाठविण्या पत्रा ॥
प्रणाम सांगावा । आईबापांना भावा ॥

## नवपुष्पाचा लय

### अभंग

कलिकेच्या स्वप्नीं चंद्र सूर्य तारे । घालिताती फेरे भोंवताली ॥
स्वर्गीचीं किरणें त्यांचा मात्र स्पर्श । केवढा तो हर्ष तीच्या जीवा ॥
पाहिलें ना जग पाकळ्या मिटल्या । अंतरीं खुलल्या वृत्ती मात्र ॥
भृंगकीटकांची कल्पना न शिवे । कोठले रहावें त्यांनीं हृदीं ॥

वदनावरतीं हास्य झळकलें । उमलूं लागलें पुष्प पूर्ण ॥
सूर्य मावळला चंद्र न उदेला । ढगांनीं पाडिला अंधकार ॥
चहूं दिशेलागी गंध दरवळे । कीटक जमले असंख्यात ॥
उघडिले नाहीं नेत्र तोंच केला । अहा चोळामोळा कलिकेचा ॥
इच्छा मनीं तिच्या, ज्यांचा स्पर्श झाला । तया किरणांला पाहण्याची ॥
" थोडा वेळ तरी राहूं द्या हे डोळे । बाकीचें वाटोळें करा सुखें ॥
डोळे भरूनीया स्वर्गीच्या दिव्यांना । अरे पाहूं द्या ना एकदांच " ॥
पहिले हे बोल झाले शेवटले । नव पुष्प गेलें गेलें लया ॥

## प्रभुला लाविलें परतोनी

( अभंग )

अंधकारमय मन जाहलेलें । कांहीं न दिसलें अंतरींचें ॥
प्रभूच्या पायांशीं हजारो भिकारी । त्यांत त्याच्या दारीं मिसळलों ॥
प्रभुराया माझ्या रहा अंतर्यामीं । निर्लज्ज बोले मी त्याच्यापुढें ॥
प्रेमळ प्रभुला आला कळवळा । येउनी ठाकला हृदयाशीं ॥
प्रभू डोकावीना माझ्या अंतर्यामीं । किती लाजलों मी काय सांगूं ॥
प्रकाश क्षणाचा पडला दिसली । घाणीची पोताडी अमर्याद ॥
दार लावूनीया घेतलें, लाविलें । प्रभुला लाविलें परतोनी ॥

## देवाचा वडीलपणा

( अभंग )

जगाचें फूगणें, जगाचा रुसवा । हाच का विसावा जगाला ह्या ॥
वडीलपणाचें नातें हें असलें । सोसतें कसलें दीना मज ॥
एक दोन प्राणी सान माझ्या होती । परि कंटाळोनी गेलों जीवा ॥
देवराया तूं तो वडील सर्वांना । काय तुझी दैना असेल रे ॥
उठल्या सुटल्या शिव्याशाप घ्यावे । सकल रुसावे तुजवर ॥
सदा जगावर उपकार करी । असली ही परी त्याची असे ॥

## जगन्माउली

( अभंग )

नव्हे चंद्रकोर स्वर्गपुष्प फूले । पराग गळाले चांदण्या ह्या ॥
स्वयें प्रभुरायें हातांत धरिलें । ह्मणुन लाभलें तेज तया ॥
सृष्टिबालकाला दूध पाजियेलें । उरलें ठेविलें उंच जागीं ॥
दुधाच्या वाटीचें नांव चंद्रकोर । थेंब सभोंवार तारकांचे ॥
दिवसाची ज्योत मालवुनी शांत । प्रभु जोजावीत सृष्टीला ह्या ॥
पाळण्याच्यापरी बांधिलें खेळणें । चांदण्या, चांदणें नांव तया ॥

# धोंडो त्र्यंबक कोचरगांवकर

## वसंत-वैभव

( चाल—सखे ग सुरेख संगम किती. )

सुखवितें मानवांप्रती, सखे ग, वसंतवैभव किती ॥ धृ० ॥
प्रियवसंत बघतांक्षणीं, हासली मुदें मेदिनी
लाजली प्रणयमीलनीं ॥ सखे ग ॥
कुसुमिता लता करवल्या, स्वागतासि सरसावल्या
मधु कुंदकळ्या उधळिल्या ॥ सखे ग ॥
वनिं आम्र तरूंच्या तती, पदतलीं कराया नती
मंजिरी-मुकुट लवविती ॥ सखे ग ॥
मालतीलतांच्या वरी, बहरुनि सुमांच्या सरी
दरवळे गंधमाधुरी ॥ सखे ग ॥
दिशिदिशीं सुरू कूजन, अलिकुलें विहंगमगण
करि वसंतगुणगुंजन ॥ सखे ग ॥
कोकिळा रसालांतरीं, गाइ गानांच्या सरिवर सरी
तव गोड लकेरींपरी ॥ सखे ग ॥
जणु एकांतिं कुणि विरहिणी, मन रमावया रागिणी
दिल्‌रुबा गात छेडुनी ॥ सखे ग ॥
मलयिंचे अनिल धावती, जललहरि-मुखा चुंबिती
तनुताप झणीं वारिती ॥ सखे ग ॥
कौमुदी सुधानिर्झरी, बरसते जगाभीतरीं
तव प्रसन्न हृदयापरी ॥ सखे ग ॥

उरिं लावुनि चंदनि उटी, हिमतुषारिं विहरे सती
स्मरपीडित जणु वसुमती ॥ सखे ग ॥
कमलिनी जलीं डोलती, कुमुदिनी नभीं नाचती
प्रमुदिनी गृहीं हासती ॥ सखे ग ॥
घरोघरींहि चैत्रांतल्या, शुभगौरी आरासल्या
कुलरमणी शृंगारल्या ॥ सखे ग
बघ लावण्यखनि लोटल्या, पुरवीथि तयीं भूषल्या
चांदण्या पथीं दाटल्या ॥ सखे ग ॥
मधुवसंतगौरीप्रती, गृहरमा मुदें पूजिती
गौरीस गौरि वंदिती ॥ सखे ग ॥
मधुमासांतलें चांदणें, ताशिं प्रशांत तारांगणें
अवलोकुनि सुखिं डुंबणें ॥ सखे ग ॥
रतिपती धनू ओढुनि, सुमशरांसि सोडी झणीं
प्रणयिनीहृदय हेरुनी ॥ सखे ग ॥
निशिनिशीं अभीसारिका, प्रियजनांसि नव बालिका
भेटुनी लुटी हारिखा ॥ सखे ग ॥
युवयुवति निकुंजांतरीं, मधुविलास लीला करी
अनुभवी स्वर्ग भूवरी ॥ सखे ग ॥
ह्या वसंत सुखसागरीं, करुं विहार इतरांपरी
चल सखे ! रमूं घडिभरी ॥ सखे ग ॥

नं. ...... ता.

## कंकण-झंकार

तारांच्या धवलस्मितें चमकत्या तारांस नीलांबरीं—
छेडोनी रमवी सुधाकर निशा वीणावती सुंदरी;
लज्जारक्तमुखी कटाक्षनिचयें भानूचिया हांसते—
संध्या मंजुवचें विहंगमुखिंच्या प्रेमास आलापिते;
प्रात:कालिं मुदें मरुल्लहरिंच्या बीनास ही ओढिते—
आनंदोल्लसिता लता तरुवरा कर्णीं कथा कूजिते;
जातांना घननीळ अंबुनिधितें वन्या सरिद्बालिका—
मंदोर्मी-ततिची सुरेल सनई फुंकोनि दे हारिखा;
यांचें गायनवादनादि भुलवी वेड्या कवींच्या मना !
यांचे फोलपणीं पुरेपुर पटे जाणीव मल्लोचना !

० ० ० ०

एकांतीं ग्रींहं गेहिनी प्रणयिनी तंद्रीत मी देखतां
हांसे लालगुलाब कुंतलिं, मुदें भालीं कचा खेळतां
गालीं दों दिसल्या सुमीं बहरल्या जाईजुईवाटिका
जादूनें बनवी गुलाब-बगिचा त्यांचा सवें कंटकां;
चमके ती जणु चंचला दचकुनी हो दूर जें कोमला
" छी: ! हें लाजविणें अचानकपणें बाई रुचेना मला "
ऐसें बोलुनि लज्जिता प्रियतमा वस्त्रांचला सांवरी—
सोन्याची शुभकंकणें रुणुझुणू झंकारलीं तीं करीं;
झंकारें अभिसारिकापदतलीं नूपूरही लाजले !
झंकारें नभिं अप्सरावदनिंचें संगीतही थांबलें !

# भवानी तलवार

( चाल---सबसे राम भजन कर० )

भवानि समशेरी राजेश्वरि ! हरहर दैवगती फिरली ! ॥ ध्रु० ॥

घोररणीं तूं रक्ताभरणीं रणनवरी नटली
रिपुमुंडांची विवाहमाला शिवकरिंची ल्याली ॥ १ ॥

गिरीकंदरीं पुरीं मंदिरीं धेनुहाक आली
उफाळलेल्या सिंहिणिसम तूं काळझेप घाली ॥ २ ॥

आर्य सतींच्या पावित्र्याची किंकाळी उठली
कंठनालिका नराधमाची चरचर त्वां चिरिली ॥ ३ ॥

गडागडांतुनि स्वतंत्रतेतें शोधित तूं फिरली
उष्ण आसवां गाळित तों ती बंदिवती दिसली ॥ ४ ॥

उसळत तळपत तूं गगनींची चपला चमचमली
अविंधहृदयें क्षणांत अवघीं छिन्नभिन्न केलीं ॥ ५ ॥

समरशोणितीं पावनतीर्थी सुस्नाता झाली
यवननृपांच्या प्राणसुमांनीं भगवति त्वां पुजिली ॥ ६ ॥

थयथय वारू नाचनाचतां तूंही खणखणली
फडफड भगवा झेंडा उडतां तूंही लखलखली ॥ ७ ॥

सूडसूड गर्जोनि चण्डिके ! म्लेंच्छांतरिं शिरली
मृतसंजीवन स्वातंत्र्यामृत घटघट तूं प्याली ॥ ८ ॥

शूर शिवाच्या वीरवल्लभे ! आजपरी असली
लोहशृंखला हाय ! हाय ! तव पायिं कशी पडली ! ॥ ९ ॥

## —स !

उद्यानामधिं बालिकागण मुदें गप्पाष्टकीं रंगला;
बाल्याचा नव्हता प्रदेश पुरता अद्याप ओलांडिला.
सौंदर्यातिशयें कुणी विलसते त्यांमाजि मुग्धानना;
वाटे इंदुकला भुवीं उतरली घेवोनि तारागणा.
गौरांगास शिशूपरी लगटलें खेबायती पातळ,
वातांदोलनिं वावरे अखुडसा निःशंक शुभ्रांचल.
कानांसन्निध केशगुच्छ कुरळे दों बाजुतें नाचती,
गालीं काश्मिरचे गुलाब हसरे भुंग जणों चुंबिती.
वेणी सुंदर आनितंब रुळते पाठीवरी सैलशी;
हातीं गोंडस कंकणें रुणुझुणू झंकारतीं गोडशीं;
सोन्याची रशना कटीवरि तिच्या नाजूकशा बैसली,
सेनादूतिच मन्मथें जनमनें जिंकावया धाडिली.
लावण्यांबुधि कोमलांगिं विमले ! तूझ्या असे साठला;
आलोकून मदीय जीव परि हा वेडापिसा जाहला !

## प्रो. पांडुरंग जिवाजी सवनीस

### माझी महत्वाकांक्षा

तुझी, भारता ! नित्य सेवा घडावी
मनें, वाणिनें, कायकर्मै; जडावी
रती ठायिं तूझ्याचि; ही एक आस
तुझें कारणीं होउंद प्राणनाश.
पुसाया तुझा एकही अश्रुबिंदू
घडे वाहवीणें जरी शोणसिंधू
मला माझिया देहिंचा तो अशेष
मना, भारता ! फार होईल तोष.
तुटे एकही कां जरी जाण साचा
दुवा दास्यरूपी तुझ्या शृंखलेचा
तरी दारपुत्रादि जें सर्व, आई, !
मला हव्य वाहीन तूझ्याचि पायीं.
विना तूझिया अन्य कोणा भजे न
मला देव तूं, धर्म तूं, पंचप्राण;
धरीली महा एकची आस जीवें---
तुला आत्मयज्ञें कसें तोषवावें.

दा. क्र. २५६६

## हुरहूर

[ सुनीत ]

भार्या मला मिळत रूपवती, विनीत,
भक्तीमती, पतिपरा, चतुरा नितांत;
आहे तसाच सुतही सुगुणीं वरिष्ठ;
लाभ मला कुशल सेवक एकनिष्ठ.
आनंद दे, वितरिते सुख नित्य विद्या,
बुद्धी शिवे न कधिंही अविचारमद्या,
आहे निवास सुगृहीं, धन इष्टदायी,
लोकीं बरें मिरवतें यश तें सदाही;
देहीं अनामय विलास सदा करीत,
दैवें मदीय सुखभांड कदा न रिक्त.

लागे जिवा हुरहुरी परि कां कळेना,
कोठे उणें वसतसें मज आकळेना;
आहे अपूर्ण कसली तरि गूढ आस
या नित्य हाय ! असुखें भरिलें मनास.

## दुर्दैवी आई

गतधवा बालिका फसली, दीन गाय पंकीं रुतली;
वांकडें पडें पाऊल; ( अबलेचें पापच सकल ! )

धरुनिया उरीं बाळाला,
गोंदेला अर्पायाला
आपला पोटचा गोळा
हतभागी बाला आली, तीरींच परी ती ठेली.
झरझरा वाहती नयन, बाळाला घाली स्नान;
राजसा उरीं कवळीलें, प्राण सर्व गोळा झाले;
तन्मुखीं मुखा ठेवोनी, विसरली सर्वही अवनी;
भ्रांतचित्त झाली बाळा;
स्थळ कळे न, कार्यहि, वेळा;
क्षण वृत्ति निमाल्या सकळा;
मग गद्गद वदली कांहीं, सांगवे न तें कविलाही.
" लाडक्या ! राजसा, ! बाळा ! आइ न मी, वैरिण साच !
दुर्दैवि, दुष्ट, पतिता मी जन्मतां कां न मेलेंच !
राजसा ! केंवि समजेल हृदयाची मम तुज आंच !
हो जरि तव मंगल, बाळ !
प्राणांचें देइन मोल,
कसलेही सोशिन हाल,
फाडुनी हृदय मम तुजला लपवीन आंत आतांच.
परि निर्धन विधवा माता, ईशही न तिजला त्राता;
मृत्यु हेंच मंगल तुजला, लाडक्या ! मोहना बाळा !
हतदैवा ! सोन्याची या माता मज केलें बायां;
पारिस बाळ ! करुणावाणी,
गर्हणीय मज, बा, न गणी,
राक्षसी न मजला मानी;

आईच तुझी मी आई, आईच खरी रे आई ! "
मातेचा करुणा-टाहो थरथरत चढे गगनाला,
तारस्वर ऐकुनियां तो तारागण कंपित झाला,
रोमांचित झाली सृष्टी स्वेदबिंदु-गणही जमला,
थरथरली गंगामाता
दुःखिता देखुनी दुहिता;
" हरहर " रव वदली आर्ता,
वेदना रमणिहृदयाची संवेद्य मात्र रमणींना.
अतिअसह्य दुःखावेगें आईचें अंतर भंगे,
उन्मळुनी पुढती पडली, गतजीवित झणिं ती झाली,
उभवुनी बाहु गोदेनें, कवाळिलें तिला ममतेनें,
पापी जरि जगतीं ठरली,
प्रेमपूर्ण तिजला गमली,
पल्लवांत तिज लपवीली;
पावित्र्य खरें प्रेमाचें, प्रमदेच्या मनसुमनांचें.

## प्रेमाची चिता

( सुनीत )

होतो एकदिनीं विनोदवचनीं दंग प्रियारंजनीं,
तेंव्हां ये वचनीं कथा सहज ती मंदाकिनीची मना

कांतेच्या, वदली " सखी मम पहा सौख्यांत डोले मुदें,
मंदा भाग्यवती खरोखर, तिची वाटे असूया मला;
झाली पास, मिळे वरी पदविही सन्मानयुक्ता तिला,
होई प्रेमविवाह, लाभत पती श्रीमंत मोठा, युवा,
आहे तोहि सुविद्य, मानधनही, शोभे सुतेजें हिरा,
हौशी फार असे, पुऱ्या करिल तो हौशी मनांच्या तिच्या. "

ऐकोनी वच तें मनांत वदलों " ठावें तुला काय तें,
हा ! हा ! हे दयिते ! जळोन पहिलें गेलें तिचें प्रेम जें !
प्रेमाची पहिल्या चिता निवलिसे , रक्षा उरे केवळ; "
निश्वासें सहजें सखोल हृदया हेलावलें माझिया.
" कां हो दुःखभरें विवर्ण सहसा झालां " ! पुसे कातरा;
" नाहीं कांहिं " वचें कसेंहि लपवी मी अंतरींचें क्षत.

## हृदयनिवेदन

घेउनि दों हातीं
मम हृदया
गेलों तिजजवळी,
बहु सदया
मजला जी गमली
अर्पाया
प्रणयिना तिजला या. १

घेउनि दों हातीं
निरखीलें
हृदय तिनें माझें,
घ्राणियलें,
उलटुनसुलटुनही
परीक्षिलें;
मुरडुनि मग अधर

तिरस्कृती
स्पष्टचि दाखवि ती
भ्रूप्रांतीं
" नीरस निर्गंध "
हो वदती
ठेवुनि तें भूवरतीं. २
कोमल भंगुर तें
मम हृदय
विदीर्ण हो शतधा;
खेदमय
मानस मम झालें:
सुसंचय
शकलांचा केला,
तो गोळा
कसा तरी लपवीला. ३
वत्सर पांच सहा
अनंतर
पिशाच्च तें माझें
भूमिवर
इतस्ततां भटके
निरंतर,
उदासीन मन फार. ४
दैवें गांठ तुझी
मग पडली,
विवाह हो अपुला
ते कालीं;
प्रणय नसे पहिला
तरि अपुलीं
एकरूप हृदयें
तीं झालीं,
दिव्य प्रेमें न्हालीं. ५
अतीव कोमलता
दिव्यतर
प्रेमाच्या लेपें
वज्रपर
सांधियलें, दयिते!
मदंतर,
लाभे मानवता,
खरोखर
सुखमय हा झाला
संसार;
देव दया करणार ६ *

* पहिल्या तीन कडव्यांतील मुख्य कल्पना प्रसिद्ध आंग्लकवयित्री ख्रिस्तिना रोझेटी इच्या ' Twice ' या कवितेंतील आहे.

# कै. कवि गोविंद

## श्री. गोविंद त्रिंबक दरेकर

### कै. लोकमान्य टिळकांस

( कै. लोकमान्य टिळकांच्या १० व्या दिवसा निमित्त )

( **चाल**—अमुचा वसंत कोठें गेला ! )

कोठें जाशी ? राष्ट्रप्राणा ? ॥
राष्ट्रप्राणा ! धर्मत्राणा ! परदास्याच्या मरणा ! ॥ धृ० ॥

कोठें जाशी ? भूसन्माना ! ॥
भूसन्माना ! विबुधवंदना ! विजयाच्या जयगाना ! ॥ १ ॥

कोठें जाशी ? जनकल्याणा ! ॥
जनकल्याणा ! स्वराज्यअरुणा ! स्वातंत्र्याच्या स्मरणा ! ॥ २ ॥

कोठें जाशी ? राष्ट्रोद्धरणा ! ॥
राष्ट्रोद्धरणा! जनाभिमाना ! पराक्रमाच्या स्फुरणा ! ॥ ३ ॥

कोठें जाशी ? देशप्रेमा ! ॥
देशप्रेमा ! प्रथितविक्रमा ! स्वयंशुद्ध श्रीरामा ! ॥ ४ ॥

कोठें जाशि ? सुगुणश्रीमंता ! ॥
हे श्रीमंता! बुद्धिवसंता ! सरस्वतीच्या संता ! ५ ॥ ॥

कोठें जाशी ! राष्ट्रानंदा ! ॥
राष्ट्रानंदा ! हे धैर्येंद्रा ! कार्यकुशल गोविंदा ! ॥ ६ ॥

गेला टिळक राष्ट्रपरमात्मा ! ॥
तयाविणें तळमळे हळहळे सारा हा जीवात्मा ॥ ७ ॥

गेला शेष आमुचा गेला ! ॥
नतशीर्षीचा आर्यभूमिचा भुगोल हा डळमळला ॥ ८ ॥

गेला राष्ट्रतात तो गेला ! ॥
या राष्ट्राचा शोकाश्रूंचा अंजलि अर्पण त्याला ॥ ९ ॥

गेला राष्ट्रजनक तो गेला ! ॥
या राष्ट्राचीं गहिंवरणारीं हृदयें अर्पण त्याला ॥ १० ॥

गेला राष्ट्रप्राण तो गेला ! ॥
या राष्ट्राची नतशीर्षोचीं नमनें अर्पण त्याला ॥ ११ ॥

भो ! भो ! भुवनमान्य श्रीटिळका ! ॥
तव राष्ट्रा या स्वराज्य द्याया पुनरपि ये या लोका ॥ १२ ॥

## श्री. रा. ब. खाडिलकर

### करुणा

( चाल—हे विश्ववंद्य गणराज )

हरि बोल बोल मजसी । मूक कां बससी ? ।। धृ० ।।
प्रेमें तुजसी बहु आळविलें,
न तुझें कैसें हृदय द्रवलें;
वाट पाहुनी नयन शीणले,
कां न दया करिसी । मूक कां बससी ? ।। १ ।।

चित्त प्रभो ! मम व्याकुळ झालें,
अश्रूंचे बहु पूर लोटले,
काय करावें मज हें नकळे;
वचना दे मजसी । मूक कां बससी ? ।। २ ।।

दयासिंधु पण कीं तव गेलें ?
चंद्रबिंब जणुं काय तापलें ?
कीं मम अंतर योग्य न झालें ?
अंत किती बघसी । मूक कां बससी ? ।। ३ ।।

राखि लाज रे ! श्री गोविंदा!
साच करी या अजि तव ब्रीदा
तव छंदें मज न सुचे धंदा
करुणा न ये कशी । मूक कां बससी ? ।। ४ ।।

सोड झणीं हरि ! तव या मौना,
भेट देइ मज पतितोद्धरणा !
आस पूरवी भव-भय-हरणा !
ऐक विनंतीसी । मूक कां बससी ? ॥ ५ ॥

धाव धाव रे ! दीनानाथा !
शरणागत मी तुज भगवंता !
कोणि न संकटिं तुजविण त्राता,
राक्षि बालकासि । मूक कां बससी ? ॥ ६ ॥

अन्याया मम घालीं पोटीं,
त्वरित सोडि ही हृदय- ग्रंथी,
न्हाणी मातें तव पद-तीर्थी
तारीं पतितासी । मूक कां बससी ? ॥ ७ ॥

दर्शन देउनि शांतवि दीना,
करुनि कृपा हरि जन्मा मरणा,
बालक रामा रमवी चरणा
दास नमी तुजसी । मूक कां बससी ? ॥ ८ ॥

## ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

### महाराष्ट्रमहोदय.

( श्री सिवाजीमहाराजांच्या काळीं महाराष्ट्रांत संत, कवि, वीर व मुत्सद्दी निर्माण होऊन महाराष्ट्राचा महोदय सर्वांगांनीं झाला तो प्रस्तुत स्तोत्रांत गाइला आहे. )

महाराष्ट्र माझा असे हा पवित्र,
हरिप्रीतिला सर्वथा पूर्ण पात्र ।
असा पुण्य भुभाग अन्यत्र नाहीं
मला नावडे यापुढें स्वर्ग कांहीं ॥ १ ॥

इथें चंद्रभागातटीं देव राहे,
इथें पुण्यगोदावरीनीर वाहे ।
त्रिलोकीं पहा ! ज्ञानदेवीसमान
नसे ग्रंथ सर्वांगसंपूर्ण जाण ॥ २ ॥

महाराष्ट्र माझा त्रिलोकीं प्रसिद्ध
इथें नांदती सत्कवी संत सिद्ध ।
इथें शत्रुनिर्दाळणीं शूर वीर ।
इथें नांदती मानवांमाजि हीर. ॥ ३ ॥

इथें कार्यकर्ते, इथें विश्वधर्ते,
इथें शोकहर्ते, इथें लोकभर्ते ।
इहामुत्र सर्वां भवीं कर्णधार
इथें नांदले, नांदती, नांदणार ! ॥ ४ ॥

इथें गाजला मर्द राजा शिवाजी,
तुकाराम भक्ताग्रणी वीर गाजी ।
इथें रामदास प्रभू श्रीसमर्थ
अशा ना मिळे कोणता हो पुमर्थ ? ॥ ५

रितें तें भरे, जें भरे तें रिचे कीं
असा खेळ खेळे विधी मृत्युलोकीं ।
कधीं खोल जाये भरेही यशानें,
चढे ऊतरे चक्रनेमिक्रमानें ॥ ६ ॥

असो आज गाईन या सुप्रसंगीं
कथा प्रेमळा सोज्वळा अंतरंगीं ।
महाराष्ट्र सद्भाग्यसंपन्न झाला
स्मरूं आदरें पूर्वजांच्या यशाला ॥ ७ ॥

पराधीनता सर्व राष्ट्रास आली,
तिच्या कारणें लोकसत्ता बुडाली ।
अती जाहली हीन दीन प्रजा ही;
न वाली कुणी राहिला तीस पाही ॥ ८ ॥

निशा दाटली घोर अंधार झाला,
विवेक स्वधर्मासवें पार गेला ।
अशा त्या महाघोर आपत्तिकाळीं
हरिस्फूर्ति उत्पन्न झाली निराळी ॥ ९ ॥

हरिप्रेरणेनें हरींचे निरोपी
जनां वाट दावावया शुद्ध सोपी ।
स्वधर्मीं स्वकर्मीं तयां जागवाया
सती संत झेपावले याचि ठाया ॥ १० ॥

हरिप्रेमगोडी जना चाखवाया,
स्वधर्मक्रिया सज्जना दाखवाया,
जना बोधवाया, धरा उद्धराया,
कवी संत झेपावले याचि ठाया ॥ ११ ॥

स्वदेशस्वधर्मस्वभाषादिकांसी
जिहीं दुर्जनीं मांडिलें वैर त्यांसीं ।
स्वबाहूप्रतापें रणीं लोळवाया
महावीर झेपावले याचि ठाया ॥ १२ ॥

अहा ! धन्य तो काळ ! गावें तयासी
स्मरूं आदरें संत वीरोत्तमांसी ।
कृती दिव्य त्यांची स्मरूं प्रेमभावें,
गुणध्यान होतां स्वयें उद्धरावें ॥ १३ ॥

शहाजीस भार्या मिळाली जिजाई
तिच्या पूर्वपुण्यासि यत्ता न कांहीं ।
सती निश्चयी धूर्त मानी सुशीला
तिच्या जन्मले श्रीशिवाजी कुशीला ॥ १४ ॥

तया थोर दादाजिही कारभारी
भला जाहला पूर्णता साहकारी ।
दिलें शिक्षण क्षात्र धर्मानुसारी
पुराणीं शिवाच्या मनीं प्रीति भारी ॥ १५ ॥

कथा रामजींची, कथा कृष्णजीची,
कथा शक्तिभक्तिप्रदा मारुतीची ।
कथा लक्ष्मणावीरबीभीषणाची
कथा स्फूर्तिदा भीष्मकर्णार्जुनाची ॥ १६ ॥

कथा ऐकतां पूर्ण तल्लीन झाला;
शिवानें मनीं निश्चयो थोर केला ।
स्वकर्तव्यनिष्ठाहि चित्तीं उदेली;
महाराष्ट्रभूकामना तृप्त झाली ॥ १७ ॥

शिवाची विभूतीच राजा शिवाजी
महाभाग, त्या जाहले विश्व राजी;
भले भाबडे गावळे मावळे ते
जयें वेधले लाविले क्षात्रपंथें ॥ १८ ॥

बळी मावळे वीर तानाजि बाजी,
यसाजी प्रभूवीर मूरारि बाजी ।
फिरंगोजि नेताजी आनाजि गाजी,
शिवाजीहि सप्रेम ज्यांतें नवाजी ॥ १९ ॥

रणीं पिंगळे पेशवे वीर गाढा
जयें लोटिले शत्रु काळाग्निदाढा ।
पिता-पुत्र नीराजि-प्रल्हाद गाजी,
निळो-रामचंद्रांसि सारेहि राजी ॥ २० ॥

रघूनाथ हणमंत विख्यात वीर,
महाधोरणी कारभारी सुधीर ।
जयें अर्पिली राष्ट्रकार्यात सारी
स्वबुद्धी, शिवाजीस जो मान्य भारी ॥ २१ ॥

तया मुख्य मंत्रीहि बाळाजि औजी,
बहिर्जीहि वार्ताहरांमाजि मौजी ।
शिवें गुंफिली थोर ही रत्नमाळा
बहू होय आनंद त्या लोकपाळा ॥ २२ ॥

बहू रत्नशाळा बहू पांचशाळा
बहू मौक्तिकांच्याहि शाळा विशाळा ।
बहु जोडिती भूप—ऐसीं न रत्नें
तिथें—जोडिलीं जीं शिवें थोर यत्नें ॥ २३ ॥

महावीर तानाजि त्याचा दरारा
अरी संगरीं कांपती त्या थरारा ।
बडा रावणीवीर तो चंडदेही
उदेभान ज्याला रणीं भान नाहीं ॥ २४ ॥

रणीं झुंजतां मल्लयुद्धासि आला .
तयांचा तिथें घोर संग्राम झाला ।
गडा देउनी सिंह कामासि आला
म्हणोनी शिवा शोकसंतप्त झाला ॥ २५ ॥

पहा अफ्‌जुला त्या फजूलास त्यानें
स्वहस्तें रणीं मारिलें नीकरानें ।
वधाया धरी शत्रु कापट्यभाव
शठां ठोकितां नाहिं दोषासि ठाव ॥ २६ ॥

असंभाव्य सामर्थ्य याचें कळेना
शिवाजी कुणा शत्रुला आकळेना ।
किती मोडिले, झोडिले, चूर्ण केले
गळाले, पळाले, पुढारी न ठेले ॥ २७ ॥

समस्तांस मस्तांस हा काळ वाटे
मराठ्यांसवें झुंजतां धाक सूटे ।
न काळाहि आटोपिती या मराठे
रणीं शूर झुंजार हे वीर लाठे ॥ २८ ॥

जुमानी न विघ्ना हटें थोरल्याही
शिवें घातली पालथी पातशाही ।
यशस्वी, मनस्वी, प्रभावंत झाला
महाराष्ट्रभाग्योदयीं सूर्य आला ॥ २९ ॥

प्रजा स्वप्रजाशा तयें लोकपाळें
पहा पाळिल्या त्या कृपाळें नृपाळें ।
समस्तांसि सन्मानुनी प्रेमभावें
शिवें लोक आकर्षिले सुस्वभावें ॥ ३० ॥

तयां गाय पूज्या जशी माय साची
तशी ब्राह्मणीं थोर निष्ठा शिवाची ।
सती-संत-अभ्यागतीं प्रेम भारी
भला धर्मनिष्ठ प्रभू सद्विचारी ॥ ३१ ॥

भवानी, जिजाई, गुरू रामदास
तयांच्या नमी नित्य भावें पदास ।
त्रिमूर्तिप्रसादें यशा पावला हो
स्मरूं त्या शिवाच्या सदा पावलां हो ॥ ३२ ॥

असा धर्मशाली महात्मा उदार
सदाचारस्वाचारसंपन्न थोर ।
शिवासारिखा भूप झाला न कोठें
स्वदेशी विदेशी पहा ग्रंथ मोठे ॥ ३३ ॥

स्वसौख्याभिलाषी न राजा शिवाजी
झिजे चंदनासारिखा लोककाजीं ।
कलीमाजिं राजर्षि ऐसा न झाला
दिलें राज्यही सद्गुरू माउलीला ॥ ३४ ॥

# श्री. लक्ष्मीबाई टिळक

## काव्य-कळी

अनुभूतीच्या घनकांतारीं
प्रेमलतेवर कळी लाजरी
उमलेना दे जरीं माधुरी
    अनाथ तूं कां पोर ?
किंचित कोठें त्वां उमलावें
खालीं वदना करुनि बघावें
बघतां बघतां कोमुनि जावें
    काळाच्या उदरांत.
वरचेवर ही बघ वनराई
रवीकिरण तो दूरच राही
प्रेमकराला मुकशी बाई
    कुरवाळी मग कोण ?
सृष्टिमाउली दवबिंदूंचें
प्रेमें गुंफी लेणें मुलिचें
वनराई परि हरुनी घेतें
    जाळी मोत्याची.
धाडी तुजला या भूवरती
—नियमहि अवघे त्याच्या हातीं
तुझ्या सारिखे कितीक जाती
    काळाच्या उदरांत.

## स्नानासाठीं

( चाल—भक्ति ग वेणी )

पाठोंपाठीं । अवदशा घेउनी काठी
दारूसाठीं । हातांत देइ करवंटी ॥ धृ० ॥
धनसुतदारेला तो मेला । निर्लज्जचा बनला चेला ॥
अन्नचा तर खुरदा केला । निशेच्या साठीं ॥
अवदशा घेतली पाठीं ॥ १ ॥
ज्ञानाच्या तो सांगे बाता । अज्ञानाच्या धरुनी हाता ॥
विज्ञानी हा ह्मणतो जगता । तुमच्या साठीं ॥
घ्या चला करा लयलूटी ॥ २ ॥
विस्मरणाचा करिं घे प्याला । रोग तनूंचे विसरुन गेला ॥
दुःख कशाचें स्वप्नीं त्याला । औषधासाठीं ॥
जिभल्या हा वेडा चाटी ॥ ३ ॥
व्हिस्की, ब्रँडी, देशी ताडी ? । असे कशाची अपणा गोडी ?
बघा कशी ती चव ही थोडी । ऋषींचे साठीं ॥
आपणा सोमरस वांटी ॥ ४ ॥
नका करूं पूर्वज-अवमाना । अमृताचा हा प्याला घ्याना ॥
नेइल स्वर्गंगेला अपणा । न्हाण्यासाठीं ।
अप्सरा लागती पाठी ॥ ५ ॥
स्वर्गंगेच्या करितो बाता । वरती बसती पाठिंत लाथा ॥
उचली ना तो अपुले हाता । स्नानासाठीं ॥
उतरला गटारा—पोटीं ॥ ६ ॥

## बहिष्कृत याला आधीं करा

( चाल—प्रिये प्रेरणे थांब गडे हा )

निशा संपता उषा पुढें ये अपुले वेळेवरी ।
जगाला हलवुन जागें करी ॥
मंदस्मित ती हास्य करुनिया बोले नानापरी ।
आळस झाडुनि फेंका दुरी ॥
किती युगांची नीज लागली, सरेल केव्हां तरी ।
बघतां वाट अतां कुठवरी ? ॥
ही पशुवृत्तीची पेठ उघडली दिसे ।
ह्या निर्लज्जेला कसें लागलें पिसें ।
कीं अंध जाहली, पुढलें ना तिज दिसें ।
थोर पोर वा वृद्ध तरुणही कोणी येता जरी ।
तुडवुन माती त्याची करी ॥ १ ॥
कितीक ललना ठार बुडाल्या अंधतमाच्या दरीं ।
तयांची दाद न कोणा परी ॥
बुडवुन त्यांना खुशाल असती नांदत अपुलें घरीं ।
देउनी ताव पुन्ह मिशिवरी ॥
ललनेसम तो नाहीं पडला—पदर शिरीचा परी ॥
शिरावर पागोटें भरजरी ॥
हें घालुनि अवघ्या समाजांत मिसळती ।
हे बंधु कुणाचे चिरंजीव वा पती ।
जन परी तयांचा विटाळ ना मानिती ।
असे श्रेष्ट नर ह्मणुनि जगाला विटाळ त्याचा नसे ।
स्त्रियांना कां जग तुडवीतसे ? ॥ २ ॥

वृद्ध विधुर हा, काठी त्याची बाळा विधवा असे ।
तिच्यावर माया त्याची दिसे ॥
तिला सोबतिण व्हावी ह्मणुनी अंगवस्त्र लेतसे ।
तरी नच्च झालें, व्हावें तसें ॥
मृत आत्म्याला पिंड न मिळतां स्वर्गी व्हावें कसें ।
पुत्रा वांचुन गृह शून्यसें ॥
जरि सोडुन गेली अशेष रदनावली ।
त्या जागीं खुलली नवीन कुंदावळी ।
लोपे न कपोलावरची एकहि वळी ।
शुभ मंगल तो कुंकुम, मळवट, मुंडावळ त्या शिरीं ।
कुणाला मुंडण्यास तो वरी ॥ ३ ॥
" कशास व्हावी तुला कुणाची उगा फुकट चाकरी ।
खा गे खुशाल मिठभाकरी ॥
धनीण गोळाभर अन्नाची, बांडे भुरकें ज़री ।
नेसुनि खुशाल जप ' हरि, हरि ' ॥
जन्मा घेशी उदरीं माझ्या लज्जा राखी तरी ।
होशिल भूषण मज तूं खरी ॥
ही जननी तव गे सान असे तुजपुढें ।
तूं तिला शिकविसी पावित्र्याचे धडे ।
हो बंधु तुला मग घेशिल त्याला कडे ।
चुंबुनि त्याला धरिशिल जेव्हां घट्ट आपुलें उरीं ।
दुणावें सौख्य तुझें कितितरी " ॥ ४ ॥
ही सौख्याची व्याख्या याची दुसऱ्यापुरती दिसे ।
आपुलें सौख्य निराळें असें ॥

जगा शिकविता एक, वागता आपण दुसरेपरी ।
रीत ही तुमची तुमच्यापरी ॥
नानारंगीं खेळ खेळुनी जगांत रमता असे ।
ईश्वरा येई तुमचें हंसें ॥
ही पतिता ह्मणुनी हिला दूर लोटिता ।
तो पतीतपावन पावे अधिकारता ।
हा न्याय कोठला परि तुमची मान्यता ।
उघडा डोळे, पुरा ओळखा कोण पतित हा खरा ।
बहिष्कृत याला आधीं करा ॥ ५ ॥

## श्री. पांडुरंग गंगाधर लिमये

### प्रेम कीं निधन !

( भैरवी. चाल— दरुवजुवा ठाडि रहूं )

( टेनिसनवरून )

मानस शंकित होई । निर्णय होय न कांहीं । मम हें ॥
प्रेम-निधन या युगलांतूनी । काय मधुरतर बाई । न कळे ॥
प्रत्यनुरागावांचुनियाही । प्रेम मधुर या हृदयीं । भासे ॥
प्रेम खरें सुखदायी । निधन न येउ कधींही ॥
मधुर तथापी निधन गमेही । आकुलतालयकारी ।
म्हणुनी मानस शंकित होई ॥
विमल प्रेमें विफल न व्हावें । जीववि आस अशी ही ।
भासे प्रेम खरें सुखदायी ॥
प्रेमरहित हा देह करी जें । निधनहि तें सुखदायी ।
म्हणुनी मानस शंकित होई ॥
पर्यायानें स्वांतिं भासती । वाइ ! कटु मधुर दोन्हीं ।
म्हणुनी मानस शंकित होई ॥
शक्य तरी मी प्रेम स्वीकरी । प्रवल निधन परि भारी ।
आल्यें । हे निधना ! घे पदरीं ॥

## पोट

( चाल—सुरजीवन पीयुष फोल गमे. )

हें उदर उदारपणा हरवी ।
करवि कुकार्य नराकरवीं ॥ धृ० ॥
जरि नर मानी । तरि नच मानी ।
अवमाना उदराकरवीं ॥ १ ॥
दुर्जनसेवा । बांधव हेवा ।
चाटुवाद चौर्यहि शिकवी ॥ २ ॥
नीति रिकामी । ज्ञान निकामी ।
हें जठराग्नि पुरें ठरवी ॥ ३ ॥

## अनंग

( चाल—मने साहाय्य करसे मुरारी रे )

जो असोनीहि अशरीर । पीडा करी वीर ।
अनिवार मनुजांतरीं ॥
जो निर्गुनी स्नेह । करि देहदाह ।
स्वयें भस्म होई तरी ॥
बेमार सुकुमार । सुमसायकें मार ।
वज्रान्तरीं जो करी ॥
जो त्रिभुवना । करि अहारणा ॥
अन्या न त्याची सरी ॥ १ ॥

## मदिरा

( चाल---थारो सबका हय सरदार पैसा )

आर्यांसि सुरा प्रिय होती ।
आदरा तुम्ही नर हो ती ॥
मद्यपी बना । खर्चुनी धना ।
काढुनि ऋणा । करुनि याचना
दे सुरार्चना पर शांती ॥ धृ० ॥
मदिरा करी दिगंत कीर्ती ।
सुकृतांहुनी सुलभ ही रीती ॥
पशुविहंगही जल प्राशीती ।
त्यांपरी न उदका बुध पीती ॥
मथिती जिच्यास्तवाचि सुर जलधी ।
त्याज्य ती वदोत सुखें खलधी ।
घ्या सुरा तुम्ही जरि सुमती ॥ १ ॥

## पतीव्रता

( चाल—अलि धांवुनिया )

धनहीन असा, ऐश्वर्यशिखरीं वा विलसा ।
अनिं मान्य असा, धिक्कार करु वा सारी रसा ॥ धृ० ॥
रूपविभव हीं लोपलीं । जनता त्यजि सारी ।
छायेसमची ही तरी ।
नित्य पार्श्वि वसे, प्रियकांतचरणार्पित मानसा ॥

## श्री. शंकर दा. चौधरी

### प्रभातकालीन चंद्रास

( विश्वाचें नियम, आणि काळाच्या लीला सर्वांनाच लागू आहेत;—
बिचारा चंद्रमा तरी त्यांतून कसा सुटेल ? )

[ चाल — भूपाळीची ]

मांगल्याच्या विमला चंद्रा दीन आज कां असा । दयाळा ॥
हास्य हरपलें, कांति निमाली, भाग्योदधिही तसा—॥
विलया गेला, मुग्धपणानें वदसी ना कारण । तयाचें ॥
आज जहालें म्लान सख्या तव प्रसन्नपुण्यानन ॥
ताप जगाचा असह्य म्हणुनी जाउनि वससी वरीं । दिगंतरि ॥
विश्वाचा हा नियम चुकें कां कोणा कोठे तरी ? ॥
हृदयवासिनी सोडुनि गेली तुझी चंद्रिका तुला । दयाळा ॥
म्हणुनि जाहला विरहाग्नीनें दग्ध सांग बा मला ॥
देवांगनांनीं पुष्पें नभिंची काल वाहिली तुला । दयाळा ॥
आज परी ती हिरवुनि नेलीं, दीन देखुनि तुला ॥
निशा संपली प्रभा फाकली राज्य जाय विलया । तुझे बा ॥
रजनिदेवि ती तदर्थ गेली सोडुनि तुज सखया ॥
नवल नसें हें न्याय जगाचा, विश्वाचा दिसतसे । तसाही ॥
वैभव जाई विलया जेव्हां आप्तप्रेमहि तसें ॥
प्रभात झाली पुष्पें फुललीं मधुप गुंगले वनीं । दयाळा ॥
चैतन्याचा पूर जगीं या खिन्न जरी तूं मनीं ॥

काल मिळालें आज हरपलें विश्वराज्य सखया । तुझें बा ॥
आदि-अंत हा काळाचा तो नियम लागला तया ॥
जा, जा, चंद्रा ! नको आणुं तूं अश्रुपूर डोळा । दयाळा ॥
विजयि नभीं ती येईल आतां सूर्यकिरणमाला ॥
क्षितिजसरोवरीं पुनीत होशिल उद्यां जरी नभवरा । दयाळा ॥
दिसेल कंठीं तारांचा तो चंद्रहार हांसरा ॥
पुरें पुरें रे जगन्मंगला येशी बा हांसत । उद्यां जरि ॥
आनंदानें खुल्या दिलानें करीन तव स्वागत ॥

## श्री. पुरुषोत्तम

### सुशिला बाला

वदन रम्य खुलें बहु हांसरें ।
नयन सुंदर तेजस नाचरें ।
सरळ चंपक-सदृश नासिका ।
विलसते सुशिला मधु बालिका ॥ १ ॥
मृदु मधु स्वकपोलिंच हांसते ।
सुखद तीक्ष्णहि दृष्टि निरोखिते ।
हळुंच मंद पदें मग टाकिते ।
मधुर अस्फुट मञ्जुल बोलते ॥ २ ॥
उचलण्या निज बाहु उभारते ।
जणुं असे बहु उत्सुक दाविते ।
सहज ये कुणि धांवुनि घ्यावया ।
दुडदुडां निघंत दुरि जावया ॥ ३ ॥
परत येइ मुदें मग झोंबते ।
धरुनि घट्ट मिठी कमरेस ते ।
' सर दुरी ' वदतां परि नायकें ।
पुनरपी फसवी बहु कौतुकें ॥ ४ ॥
मग जरा रुसतां मनिं खिन्न हो ।
' चल निघे झणिं येथुनि दूर हो ' ।
वचन क्रोधभरें, श्रवुनी असें ।
मधुर एकचि बोल तदा हंसे ॥ ५ ॥
मग चढे शरिरावरि खेळते ।
उभय बाहु गळ्यामधिं टाकिते ।

हलवुनी मृदु मानचि बोलते ।
" खलंच कां लुसला ? मज सांग तें ॥ ६ ॥ "
कुरळ केश कपोलिंच क्रीडती ।
उभय हस्त तयां दुरि सारिती ।
मधुनि घट्ट मुठी धरि लीनता ।
' खलं न जाइन ले नच मी अतां ' ॥ ७ ॥
वदन म्लान तदा बहु कावरें ।
नयनिं अश्रु फुले, मन बावरें ।
कुणि न घेइ तिला न बघे फुकें ।
टपटपा स्रवलीं जल-मौक्तिकें ॥ ८ ॥
जननि धांवुनि घे कडिय तिला ।
' कुणिं ग मन्मन-हंसाचि त्रासिला ।
पुनरपी न च जाय न तूं चुकें ।
मम जिवा ' ! वदुनी बहु घे मुके ॥ ९ ॥
क्षण न जाय खुले कलिका तदा ।
हंसत मुग्ध डुले खलु तोषदा ।
पुसुनि नेत्राचि सांवरि कुंतला ।
चमकली चपला जणुं चंचला ॥ १० ॥
तुरुं तुरूं मग चालत ती निघे ।
हळुंच मागुनि झांकुनि नेत्र घे ।
उचलुनी हृदयांतरिं स्थापिली ।
परम हर्षयुता मनिं रंगली ॥ ११ ॥
अहह ! ईशकृती मधुरा किती ! ।
परि न मानव जाणत सत्य ती ।

क्षण घडे असलें जरि दर्शन ।
सहज होयाचे दुःख-विमोचन ॥ १२ ॥
सुशिल बाल प्रभो ! हंसरें सदा ।
नच कदा शिवु त्या मुळिं आपदा ।
नयन-रम्य सुमा फुलवी मुदें ।
कुसुमगंधभरें जन तोषु दे ॥ १३ ॥

## 'आयुष्यांतील पहिलें दुःख

Mrs. Hemans इच्या The First Grief चें रूपांतर

—दिंडी वृत्त—

अहो बोलावा बंधु कुठें गेला ।
तयाविण ना खेळण्या मजा आला ।
लतापुष्पीं ये बहर वसंताला ।
परी माझा प्रिय-बंधु कुठें गेला ॥ १ ॥
फूलपांखरूं हें बागडे मजेनें ।
सूर्यकिरणांशीं क्रीडतें सुखानें ।
त्याशिं खेळाया बुद्धि होत नाहीं ।
भाउ अजुनी कां परत येत नाहीं ॥ २ ॥

लता वेली ज्या लाविल्या करांनीं ।
फुलुनि उद्यानीं बहरती फुलांनीं ।
द्राक्षवेलींना मधुर घोंस आले ।
कुठें सांगा मम बंधुराज गेले ? ॥ ३ ॥

बोल बाला ! त्या ऐकु येत नाहीं ।
सांग मधुरा ! तो कसा इथें येई ? ।
रम्य हंसरी मधुमूर्ति ती निमाली ।
भूतलावरि दुष्प्राप्य अतां झाली ॥ ४ ॥
रम्य, देवानें तया दिलें होतें ।
गुलाबापरि आयुष्य थोडकें तें ।
जाइ बाळा ! तूं खेळ एकटाच ।
बंधु वसतो स्वर्गांत तुझा साच ॥ ५ ॥

जाइ सोडुनि कां पक्षि फुलें साच ? ।
व्यर्थ हांका कां मारिल्या उगाच ? ।
रम्य मधुमासीं दीर्घकाळ ठायीं ।
कदापी तो परतणार नाहीं ? ॥ ६ ॥
झऱ्याकाठींच्या पुष्पवाटिकेंत ।
सर्व फेऱ्या कां आजि वृथा होत ? ।
बंधु माझा मत्सवें खेळतांना ।
प्रेमभावें दाटतो कंठ जाणा ॥ ७ ॥

## श्री. ना. ग. पिंगळे

### ही कोण ?

गेली सोडुनि देश दूर म्हणुनी रागेजली सुंदरी
येतां मी परतोनि ती मजसवें मौनव्रतातें धरी
राहे निश्चल, शब्दही नच वदे, मालिन्य अंगीं वरी ।
वस्त्रें धूलि-परिप्लुतें, मज गमे दुःखें झुरे अंतरीं ॥ १ ॥
देखोनी सखिला, कटीं उचलुनी म्यां मंदिरीं आणिलें
उत्संगीं प्रणयें तिला निजकरें म्यां आपुल्या स्थापिलें
मालिन्यें भरली म्हणोनि दुसरीं वस्त्रें दिलीं तीं स्वयें
'प्रेमें बोल मशीं' असें विनविलें 'सोडोनि रागा सये' ॥२॥
ठावें त्या रसिकांसि दुःख इतरां कैसें कळे तें किती ?
जेव्हां भग्न करी मनोरथ सखी मौनव्रतानें सती
कोण्या चाटुवचें प्रसन्न करणें रागेजली जी अती
नाहीं सत्कविही समर्थ कथनीं, कैची मदीया मती ? ॥ ३ ॥
औत्सुक्यें प्रणयें तिला मग हृदीं आलिंगनें तर्पिलें
तारामैत्रक तें करोनि रतिच्या लोभें करें स्पर्शिलें
झाली कंपित, शब्द स्पष्ट नुमटे, क्रोधें झणत्कारिली
वाटे विद्ध करी मला खरतरा सोडोनि बाणावली ॥ ४ ॥
गेला काल, कपोलयुग्म सुकले तेजां स्वकीया तदा
आला मित्र गुणी श्रुतिज्ञ सदना, देखोनिया आपदा
बोले, 'कां दिससी असा ? वद सखे ! कां ही त्वदीया प्रिया
अंकारूढ असोनि गान न करी जी गा सदा मोददा' ॥ ५ ॥
त्यातें वृत्त समस्त मी कथियलें; तेव्हां तिला प्रेमलें

अंकीं स्थापुनि आपुल्या मृदुकरें वक्षःस्थलीं स्पर्शिलें
कर्णी प्रेमवचा वदे, मग तिनें शैथिल्य तें त्यागिलें
प्रेमें कंपित होउनी मधुरवें गानास आरंभिलें ॥ ६ ॥
जेव्हां ती मधुरा गिरा प्रसवली आनंदलें मन्मन
शृंगारादिरसोदधींत गमलें झालें असे मज्जन
झाल्या कंपित सर्वही हृदयिंच्या तारा; तुटे बंधन
नादब्रह्मनिमग्नचित्त नुरलें दुःखास जें कारण ॥ ७ ॥
मित्रातें रसिका तदा विनविलें येई गृहा माझिया
अंकीं घेउनिया हिला मधुरवें लावीत जा गावया
गानाभ्यास नसे मुळींच घडला, जाणे न मी वादना
त्यायोगें मधुरा सतार न करी माझ्या करीं गायना ॥ ८ ॥
जीं कां वाक्सुमनें पुरा विलसलीं जिव्हालताग्रावरी
आमोदग्रहणीं भुले रसिकही भृंगापरी त्यावरी
अज्ञानें परि फेंकिलीं अरसिकें जीं मीं नभोभ्यंतरीं
त्यागोनी स्मृतिच्या पथा विनटली ती नादरत्नाकरीं ॥ ९ ॥

## श्री. सोपानदेव चौधरी

### भाग्यवान भिकारी

( जाति—असा धरि छंद )

भूल मनाला; हा कोण भिकारी आला ! धृ०
झोळी दिसते अगदीं खाली
खाली कसली ? अखंड भरली
भिक्षा देतां स्वतां पाहिली
काय ही लीला ! हा कोण भिकारी आला ! ॥ १ ॥
इतर भिकारी दारीं येती
केविलवाणें तोंड करीती
परंतु याची गंभिरवृत्ती
खिळे नयनाला ; हा कोण भिकारी आला ! ॥ २ ॥
" भिक्षांदेही " मुखीं निघेना
" मना सज्जना " श्लोक ह्मणेना
लोक आदरें देती दाना
येइ मनाला; हा कोण भिकारी आला ! ॥ ३ ॥
भिकार वस्त्रें अंगीं नाहीं
दैन्यावस्था स्वप्नीं नाहीं
श्रीमंतीचा लेश नसेही
जादूवाला; हा कोण भिकारी आला ! ॥ ४ ॥
जीवन व्हाया हें सुखकारी
कुणी कुणाच्या जावें दारीं

जग हें आहे सर्व भिकारी
पटवि मनाला; हा कोण भिकारी आला ! ॥ ५ ॥
नवें नवें सुख मिळण्यासाठीं
सदा भांडते मानवजाती
भांडुनि मिळतें काय संप्रती
सौख्य जिवाला ? हा कोण भिकारी आला ! ॥ ६ ॥
दान करा हो अपुल्या हातें
अमोल जें देणें द्यायातें
उठा उठा धर्माचे दाते
भिक्षा घाला; हा कोण भिकारी आला ! ॥ ७ ॥
धर्म एक परि नाना जाती
पंथ किती त्या नाहीं गणती
माळ तयाची गुंफोनी ती
कंठीं घाला; हा कोण भिकारी आला ! ॥ ८ ॥
नव्या जुन्याचें मंथन करुनी
सार तयाचें द्यावें काढुनि
भिक्षा असली अमोल वाढुनि
सुखवा त्याला; हा कोण भिकारी आला ! ॥ ९ ॥

# उत्कंठा

बाले ! पाहुं नको अशी मजकडे तूं चोरट्या दृष्टिनें,
नाहीं मी रचणार काव्य तव तें सौंदर्य पाहूनिया,
केलीं आजवरी कितीक कवनें गाया कवींनीं तरी
गाती आजहि माधुरी मधुरशा रूपास मोहूनिया ॥ १ ॥
कोणी वांच्छिति व्हावयास तुझिया अंगांतलीं भूषणें,
कोणी वांच्छिति व्हावयास गजरा नाजूक वेणींतला,
‘ माझी होशिल कां ’? म्हणूनि झुरती कित्येक उच्छृंखल,
कोणी भाविक संत पूजिति तुला देवीच संबोधुनी ॥ २ ॥
तूं काव्यांतिल मूर्तिमंत पुतळी, देवी असो वा कुणी
जीवाची मम एक आस उरली पाहून बाले ! तुला,
ज्याची होशिल तूं खरी कुलवती मैत्रीण गे जन्मिची
केव्हां पाहिन ! त्या नरास सुभगा उत्सूकता ही मला ॥ ३ ॥
सद्भाग्यें जर योग्य जोड तुमची नांदेल या भूवरी
अंतीं एकच मागणें तुजकडे आनंद हा वाढवी;
जेव्हां येइन मी चुकून सहजीं गेहीं तुझ्या चालुनी
बाले ! दोनच गोड शब्द मजसी बोलून संतोषवी ॥ ४ ॥
( आणि तुला जर योग्य जोड न मिळेल तर !— )
आणावें न मनीं, परंतु मन हें पाण्याहुनी चंचल,
स्वर्गीची कुणि पुष्पवृष्टि तुडवी नादान पायातलीं ?
ढाळावे मग अश्रु लोचनिं गडे ! पाहूनि मी दृश्य हें
दुर्दैवें लतिका चुकूनि पडली वृंदावनाच्या गळीं ॥ ५ ॥

## सौ. कमलाबाई पाटणकर

### बाहुल्यांची तक्रार

( चाल—गज्जल )



ही काय बाइ आई
आह्मां मुलीं न घेई
घेते नव्या मुलीला
गाते तिच्या स्तुतीला

कपडं नवं तिलाही । फिरण्या तिलाच नेइ
खाऊ तिलाच देई । ऐशी कशी ही आई
आह्मा न धीर येई । वदण्या तिलाहि कांहीं
भीती मनास मोठी । पाठींत देइ काठी
अमुच्या ह्मणोनि भाळीं । वनवास ये अकाळीं

ईशा सुबुद्धि देई । मग ती अह्मांस घेई.
ऐशी कशी ही आई । आह्मां मुळीं न घेई.

## भातुकली

### वृत्त—शा. वि.

खेळूं भातकुली म्हणून जमलीं सारीं मुलें क्रीडण्या,
होती हर्षभरें प्रसन्न वदनें, आनंद हो तेधवां;
नाना शंकर भालु ताइ सुशिला वेगू तशी हो चिमी
लाडू शेव करंजि ताजि जिलबी त्यांना न कांहीं कमी ॥ १ ॥
मालू प्रौढपणें म्हणे हंसुन त्या ' आजी पहा होइन'
ताई, शंकर, वेगु, बाल, सुशिला तें बोलती ऐकुन,
नाना शांतपणें ह्मणे ' तव अर्जी ! होईन मी चाकर,
सांभाळीन फराळ हाहि सगळा जा देवळा लौकर" ॥ २ ॥
हो हो बोलुनि मालु पाठ वळवी जाण्या निघे लौकर
सानंदें बहु खाइ तो लगबगा होई ध्वनी कुरकुर
जों पाहे वळुनी जरा मधुनि तो, तों काय देखीयलें !
आजी तत्क्षणिं ये मुलासहित त्या, डोळे कसे जाहले ! ॥ ३ ॥

पूज्य रसिकांनो ! वंद्य कविवरांनो !
विनति चरणांबुजिं आपुल्या सुधींनो !
फुलें आलीं निर्गंध आढळून—
तरी टाका ना पायिं कुस्करून !

## कवितांच्या पाहिल्या ओळींची सूचि.


| | |
|---|---|
| अनुभूतीच्या घनकांतारीं | ६७ |
| अहो बोलावा बंधु कुठें गेला | ७९ |
| अंधकारमय मन जाहलेलें | ४३ |
| " आदी मी लपतो इथें, कधुं नका, येतें धराया गुनी | १४ |
| आर्यांसि सुरा प्रिय होती | ७४ |
| उडुगण हंसरा हा हांसवी यामिनीला | १३ |
| उद्यानामधिं बालिकागण मुदें गप्पाष्टकीं रंगला | ४९ |
| कलिकेच्या स्वप्नीं चंद्र सूर्य तारे | ४२ |
| कामें आटपुनी, श्रमून अगदीं आलीस तूं जेधवा | ३३ |
| किति फिरूं सख्या मी तुजकरितां ? | २० |
| कृष्ण ढगांच्या गर्दीमधुनी वीज रुपेरी चमकावी | १७ |
| कृष्णातीरिं सदाच वास मिळुं दे, तो स्वर्ग आह्मां नको | ३१ |
| कोठें जाशी राष्ट्रप्राणा ? | ५६ |
| खेळूं भातकुली ह्मणोनि जमलीं सारीं मुलें क्रीडण्या | ८७ |
| खेळे जलाशयासीं । उधळीत प्रेमराशी | २७ |
| गतधवा बालिका फसली, दीन गाय पंकीं रुतली | ५१ |
| गेलो सोडुनि देश दूर ह्मणुनी रागेजली सुंदरी | ८१ |
| घेउनि दों हातीं मम हृदया | ५४ |
| जगाचें फुगणें जगाचा रुसवा | ४४ |
| जो असोनीहि अशरीर । पीडा करी वीर | ७३ |
| ज्याच्या शिरीं पागुटें फाटलेलें, जुनी जाड खांद्यावरी घोंगडी | १९ |
| झालें काय अवा अले तुज असें, पोटांत येते कळ | १४ |
| ताई लीला खेळ खेळती मंदिर रामाचें | २८ |

| | |
|---|---|
| तारांच्या धवलस्मितें चमकल्या तारांस नीलांबरीं | ४७ |
| तुझी, भारता ! नित्य सेवा घडावी | ५० |
| तुझें पत्र आलें । पाहुन हंसूं फार आलें | ४२ |
| ते आले जवळी नि कानगुजलें, हातीं करा दाबुन | २९ |
| धनहीन असा, ऐश्वर्य शिखरीं वा विलसा | ७४ |
| नव्हे चंद्रकोर स्वर्ग पुष्प फूले | ४४ |
| निशा संपता उषा पुढें ये अपुलें वेळेवरी | ६९ |
| पांखरें तान्हीं देवाचीं गोजिरवाणीं | ४५ |
| पाठोपाठीं । अवदशा घेउनी काठी | ६८ |
| पोटाचा बनलों गुलाम दुबळा दाही दिशा हिंडुनी | १० |
| पौर्णिमा-रजनी प्रशांत मोठी, | ३४ |
| प्रीतिची कळी हृदयिं उमलली | १२ |
| प्रीतीचा क्षय लागला वणवणा पृथ्वीसभोंतीं फिरे | ४ |
| प्रेमाचे मृदु तंतु सर्व अणखी धागे जिवाचे मृदु | ३२ |
| बोल बोल कां अबोल ? बोल बालका | ५ |
| बाले ! पाहुं नको अशी मजकडे तूं चोरट्या दृष्टिनें | ८५ |
| भवानि समशेरी राजेश्वरि ! हरहर दैवगती फिरली ! | ४८ |
| भार्या मला मिळत रूपवती, विनीत | ५१ |
| भूल मनाला, हा कोण भिकारी आला | ८३ |
| महाराष्ट्र माझा असे हा पवित्र | ६० |
| मानस शंकित होई । निर्णय होय न कांहीं | ७२ |
| माला ग्रहांची करीं घेउनिया यशोगायना देवही लागलें | १ |
| मांगल्याच्या विमला चंद्रा दीन आज कां असा ! दयाळा | ७५ |
| मूर्ती पाहुनिया त्वदीय सखया । मन्नेत्र आल्हादती | ९ |
| याचना न कामाची । जा खुशाल माघारी | ७ |

येई रे येइ गडे गोड पाखरा ३
" रे मूढा ! तव नांव काय ? मजला रागावुनी पाहशी १५
वदन रम्य खुलें बहु हांसें ७७
वंचना पुरे आतां निष्ठुरे दया दावी २
विद्युत्तेजलता नभीं चमकली मेघोदकीं जन्मली ४०
व्योमविहारी ! स्वेच्छाचारी ! द्विजोत्तमा ये झणीं २२
सवेग मदीय हृदयासनी बस सदैव हे स्वामिनी ! ८
सुखवितें मानवाप्रती, सवेग वसंत वैभव किती ४५
सुखाचा काल तो बाले । विधीनें लेखिता भालीं ६
सोड सख्या मार्ग झणीं चंद्र उभा डोइवरी १७
सोडूनि कोकिले ! मधुतान झणीं गाई आजि आळवुनी ८
हरि बोल बोल मजसी । मूक कां बससी ५८
ही काय बाइ आई । आह्मां मुळीं न घेई ८६
हें उदर उदारपणा हरवी ७३
होतो एक दिनीं विनोदवचनीं दंग प्रियारंजनीं ५३
होती कोमल एक गोड कलिका वेलीवरी शोभती २६

# कविपरिचय.

१ श्री. माधव रंगनाथ काळे उर्फ मंजुमाधव. जन्म १९३०. यांचें इंटर पर्यंत शिक्षण झालें असून ते सध्यां मुंबईच्या एका सिनेमा कंपनींत प्रमुख नट आहेत. इंग्रजी शाळेंत शिकत असतांनाच हे कविता लिहूं लागले. त्यांच्या कविता निरनिराळ्या मासिकांत छापून प्रसिद्ध झाल्या आहेत.

२ श्री. सदाशिव वासुदेव निफाडकर; हे सेकंड इअर ट्रेंड असून येथील म्युन्सिपल शाळेंत शिक्षक आहेत. यांच्या कविता 'ज्योत्स्नाविहारी' या नांवानें विविध वृत्तपत्रांतून व मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

३ श्री. पुरुषोत्तम विश्वनाथ रहाळकर यांनीं टिळक राष्ट्रीय विद्यालयाच्या कॉलेजांत दोन वर्षें शिक्षण घेतलें यांनीं आपली पहिली कविता १९१६ चे सुमारास लिहिली. यांच्या कवितां मासिकांतून ' वनवसंत ' या टोपण सहीनें प्रसिद्ध झाल्या आहेत. सध्यां ते नाशिक येथें फोटोग्राफीच्या धंदा करीत आहेत, व लवकरच सिनेमा फोटोग्राफीस सुरवात करणार आहेत.

४ श्री. वसंत कृष्ण हेबळे उर्फ कुसुमाकर यांचें दुय्यम शिक्षण येथील सरकारी हायस्कुलांतून झाल्यावर ते उच्च शिक्षणार्थ मुंबईस गेले; बी. एस् सी. परीक्षा पास झाल्यावर मुंबईसच चिनॉय ब्रदर्सच्या बॉम्बे गॅरेजमध्यें पर्सनल असिस्टंटची नौकरी करीत आहेत.

५ श्री. मधुसूदन विष्णु गोखले ( मधुसूदन ) यांचें दुय्यम शिक्षण येथील सेंटजॉर्जेस हायस्कूलमध्यें झाल्यावर ते येथील एच्. पी. टी. कॉलेजांत दाखल झाले; इंटर पर्यंत शिक्षण झाल्यावर त्यांनीं कॉलेज सोडलें; सध्यां ते म्युन्सिपल ऑफिसमध्यें काम करीत आहेत. त्यांच्या कविता व लेख बाळबोध मेव्यांतून प्रसिद्ध होत असतात.

६ श्री. वसंत हरी खर्शीकर बी. ए. हे मूळचे पुण्याकडचे, पण उच्च शिक्षणाकरितां ते नाशिकास आले व गुदस्तसालीं एच्. पी. टी. कॉलेज, नाशिक, मधून बी. ए. झाले; ते सध्यां एम. ए. चा अभ्यास करीत आहेत. यांच्या कांहीं कविता न्यू पूना कॉलेजाच्या मासिकांत छापून आल्या आहेत.

७ श्री. ग. रं. शिरवाडकर ( कुसुमाग्रज ) हे येथील एच्. पी. टी. कॉलजचे विद्यार्थी आहेत. यांच्या कांहीं कविता बालबोधमेवा, नवामनु वगैरे मासिकांतून व वृत्तपत्रांतून छापून प्रसिद्ध झाल्या आहेत.

८ श्री. ग. ल. टोकळ(जन्म १९०९)हे मूळचे नगरचे राहणारे.सध्यां हे नाशिक कॉलेजांत शिक्षण घेत आहेत. यांच्या कविता अजून अप्रसिद्ध आहेत.

९ श्री. सदाशिव सिताराम देव हे आपल्या कविता विद्याधरानुज या नावानें प्रसिद्ध करतात. हे येथील कोर्टांत नौकरीस आहेत.

१० श्री. वा. श्री. पुरोहित, बी. ए. ( विनीत ) जन्म १९००; इंग्रजी शिक्षण नाशिक हायस्कूलमध्यें व उच्च शिक्षण फर्गसन कॉलेजमध्यें झालें. कविता रचनेचा आरंभ १९२० सालीं झाला,व १९२४ पर्यंत त्रुटित कविता लिहिल्या. पहिल्या कविता"अरविंद"मासिकांत छापल्या. 'त्याग' कादम्बरी १९२९ सालीं प्रसिद्ध केली.यांना नाट्यकलेचा विशेष नाद आहे. हे नाशिक येथील महाराष्ट्र नाट्य मंदिराचे उत्साही कार्यकर्ते आहेत.

११ डॉ. प्र. शं. गुते, एम्. बी. बी. एस्. हे येथील प्रसिद्ध व लोकप्रिय डॉक्टर आहेत. यांच्या बहुतेक कविता अजून अप्रसिद्ध आहेत.

१२ मनोहरमाधव हे एक तरुण होतकरू कवि आहेत.

१३ श्री. प्रभाकर कृष्ण सोहनी हे सध्यां डिस्टिलरीमध्यें नौकरीवर आहेत. यांनीं बऱ्याच कविता लिहिल्या असून त्या अजून अप्रसिद्ध आहेत. त्यांचें टोपण नांव ' फकीर '.

१४ प्रो. रामचंद्र श्रीपाद जोग, एम्. ए., ( निशिगंध ) हे येथील कॉलेजांत प्रोफेसर आहेत. यांचीं 'ज्योत्स्नागीत' व 'निशागीत' हीं गीतांची दोन छोटीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. हे 'अभिनव काव्यप्रकाश' नांवाचा काव्यविमर्शाचा एक ग्रंथ लवकरच प्रसिद्ध करणार आहेत.

१५ श्री. ग. गो. जोशी हे पूर्वी मालेगांवास मराठी शाळेचे हेडमास्तर होते. सध्यां पेन्शन घेऊन नाशिकासच राहात आहेत. यांच्या कवितांचे तीन

भाग 'पद्यपुष्पहार' या नांवानें प्रसिद्ध झाले आहेत.

१६ श्री. देवदत्त नारायण टिळक, बी. ए., एल् एल्. बी., वकील, हे प्रसिद्ध खिस्तवासी कवि नारायण वामन टिळक यांचे चिरंजीव. यांची पहिली कविता 'गोंडदार चाबूक' ही त्यांनीं अगदीं लहानपणीं लिहून प्रसिद्ध केली. हे 'ज्ञानोदया'चे व 'बालबोधमेव्या'चे संपादक आहेत. यांनीं बऱ्याच कविता लिहिल्या आहेत व 'तित्र जाणीव,' 'छोटा संस्थानिक' व 'कृष्णा' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

१७ श्री. धोंडो त्र्यंबक कोंचरगांवकर, बी. ए., वकील, यांचें सर्व शिक्षण येथील न्यू इंग्लिश स्कूल व एच्. पी. टी. कॉलेज या संस्थांमध्यें झालें. कॉलेजमध्यें असतांनाच ते १९२८ सालीं मुंबई हायकोर्टाची वकीलीची परीक्षा पास झाले. यांच्या कविता निरनिराळ्या मासिकांतून व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. 'स्मशानांतील सहल' हें यांचें खंडकाव्य व इतर स्फुट कवितांचा संग्रह लवकरच प्रसिद्ध होईल. यांनीं आपली पहिली कविता १९१९ सालीं शाळेंत असतांना लिहिली.

१८ प्रो. पांडुरंग जिवाजी सबनीस, एम्. ए., एल् एल्. बी. हे येथील कॉलेजांत प्रोफेसर आहेत. यांच्या कविता, लेख व गोष्टी निरनिराळ्या मासिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. यांनीं प्रसिद्ध कवि रवींद्रनाथ ठाकूर यांच्या एका नाटकाचें भाषांतर केलें आहे. यांच्या स्फुट कवितांचा संग्रह लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

१९ प. वा. कवि श्री. गोविंद त्र्यंबक दरेकर हे स्वातंत्र्यशाहीर 'कवि गोविंद' या नांवानेंच प्रसिद्ध आहेत. यांच्या कविता जाज्वल्य राष्ट्राभिमानानें रसरसलेल्या आहेत, त्यांपैकीं पुष्कळच सरकारजमा झाल्यामूळें त्यांच्या सर्व काव्यांचा आस्वाद आजच्या वाचकांना घेतां येत नाहीं. लवकरच त्यांच्या अनाक्षिप्त कवितांचा संग्रह 'गोविंदकाव्य' या नांवानें प्रसिद्ध होणार आहे.

२० श्री. रा. व. खाडीलकर, बी. ए., एल् एल्. बी. वकील; यांचें शिक्षण नाशिक हायस्कूल व फर्ग्युसन कॉलेजमध्यें झालें. यांनीं संगीताचा शास्त्रीय अभ्यास केलेला आहे.

२१ ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए. संपादक 'मुमुक्षु,' हे सुप्रसिद्ध संत व वाङ्मयभक्त महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचे आहेतच. यांनीं मोरोपंत, तुकाराम इत्यादी कवींचीं चरित्रें लिहिलीं आहेत. जुन्या कवींच्या वाङ्मयाचा यांचा व्यासंग फार दांडगा आहे. बऱ्याच जुन्या कवींचे ग्रंथ यांनीं सटीप छापून प्रसिद्ध केले आहेत. महाराष्ट्र वाङ्मयाचा एक विस्तृत इतिहास त्यांनीं लिहिला असून, ते तो लवकरच छापून प्रसिद्ध करणार आहेत.

२२ श्री. लक्ष्मीबाई टिळक या प्रसिद्ध कवि प. वा. ना. वा. टिळक यांच्या पत्नी. या फार वर्षांपासून कविता करतात. यांनीं आपल्या पतीच्या आठवणी लिहिल्या असून त्या आठवणी व स्वतःच्या कविता त्या लवकरच छापून प्रसिद्ध करणार आहेत.

२३ श्री. पां. गं. लिमये बी. ए., एस्. टी. सी. ( ऑनर्स ) हे येथील सरकारी हायस्कूलचे हेडमास्तर आहेत. यांनीं 'चतुरगडच्या विनोदी स्त्रिया,' 'रजाचा गज' व 'निर्मळ प्रेम आणि नीतिबाह्य प्रेम' हीं पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत. यांच्या 'रजाचा गज' या पुस्तकाला डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रा. सोसायटीनें रु. ७५ चें बक्षिस दिलें आहे. प. वा. ह. ना. आपटे यांच्या 'सती पिंगला'नाटकांतील सर्व पदें यांनींच केलीं आहेत.

२४ श्री. शं. दा. चौधरी, बी. ए. एल्एल्. बी., हें नगरचे राहणारे; येथें वकिली करतात. यांच्या कविता कॉलेजच्या मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

२५ श्री. पुरुषोत्तम, बी. ए. एल्एल्. बी. हे येथें वकिली करतात. सबंध नांव प्रसिद्ध करण्याची त्यांची इच्छा नाहीं.

२६ श्री. नारायण गोविंद पिंगळे, बी. ए. हे येथें डेप्युटी एज्युकेशनल एन्स्पेक्टर आहेत. यांनीं बऱ्याच संस्कृत व मराठी कविता लिहिल्या आहेत, परंतु त्या बहुतेक अप्रसिद्ध आहेत. यांचे कांहीं विनोदी लेख मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. धम्मपद हा ग्रंथ इंग्रजी नोट्स्‌सह त्यांनीं प्रसिद्ध केला आहे. होमिओपाथी व आर्यवैद्यक या विषयांत हे निष्णात आहेत.

२७ श्री. सोपानदेव चौधरी हे गांधर्वमहाविद्यालयाचे गवई व शिक्षक आहेत. यांनीं बऱ्याच कविता केल्या आहेत, पण त्यांपैकीं पुष्कळ अप्रसिद्ध आहेत.

२८ सौ. कमलाबाई पाटणकर या प्रसिद्ध साहित्यसेवक श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या कन्या व प्रो. भा. ल. पाटणकर यांच्या पत्नी. शिक्षण मॅट्रिक पर्यंत झालें आहे. वडिलांच्या विनोदाची छया यांच्या गद्य लिखाणांत दिसते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 25566

हें पुस्तक नाशिक येथें रा. रामभाऊ गणू देवकर यांनीं आपल्या सुदर्शन छापखान्यांत छापिलें; व प्रो. पांडुरंग जिवाजी सबनीस, अध्यक्ष, वाङ्मय विहार मंडळ यांनीं पेठेवाडा, दहीपूल, नाशिक येथें प्रसिद्ध केलें.

## शुद्धिपत्र

( सहज समजणार नाहींत तेवढींच अशुद्धें शुद्ध केलीं आहेत. )

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८ | १९ | जगते | जगतां |
| ९ | फुटनोट घालावी | | कुमारी=चारुकेसर=गुलाब |
| १० | ५ | जीवतीं | जीवना |
| १५ | १८ | माझी, सख्या | माझी सख्या ! |
| १९ | १७ | पायबंदीं, तयाची | पायबंदी तयाची |
| १९ | २२ | चेतलेला, निखारा | चेतलेला निखारा, |
| २२ | ११ | ामिनी | कामिनी |
| २८ | ३ | ताईलील | ताईलीला |
| २९ | १४ | तो | तों |
| ३४ | १५ | " हृदय | ' हृदय |
| ३८ | १५ | तिला. | तिला, |
| ४३ | १५ | डोकावीना | डोकावीतां |
| ४४ | ५ | माझ्या होती | माझ्याहोनी |
| ४४ | शेवटची | पाळण्याच्यापरी | पाळण्याच्यावरी |
| ४७ | १६ | जं | जें |
| ४७ | १९ | तीं | तों |
| ६१ | शेवटची | निराळी | निराळीं |
| ७० | ११ | वरी | वरी ! |
| ७४ | १७ | वा | वा |
| ८१ | पहिली | ना. ग. | ना. गो. |
| कविपरिचय | २ | १९३० ( कांहीं प्रतींत ) | १९०३ |

## वाङ्मय विहारमंडळाचे १९२९-३० सालचे कार्यवाहक

अध्यक्षः---प्रो. पां. जि. सबनीस

उपाध्यक्षः---प्रो. रा. श्री. जोग

चिटणीसः---प्रो. भा. ल. पाटणकर

श्री. पु. वि. रहाळकर

खजिनदारः---श्री. धों. त्र्यं. कोचरगांवकर

पान ३१ व कविपरिचय पान ५ यांत प्रभाकर कृष्ण सोहनी ’ ऐवजीं “ लक्ष्मण प्रभाकर सोहनी ” असें वाचावें.

REFBK-0002866
REFBK-0002866

हें पुस्तक नाशिक येथें रा. **रामभाऊ गणू देवकर** यांनीं आपल्या **सुदर्शन** छापखान्यांत छापिलें; व प्रो. **पांडुरंग जिवाजी सबनीस**, अध्यक्ष, वाङ्मय विहार मंडळ यांनीं पेठेवाडा, दहीपूल, नाशिक येथें प्रसिद्ध केलें.